सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ७ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## थोडी वाट पाहा, अयोध्या-काशीनंतर आता मथुराची बारी; मुख्यमंत्री योगींचे सूचक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मथुरा**

उत्तर प्रदेशातील अयोध्या आणि काशीसोबतच मथुरेची अनेकदा चर्चा होते. या मुद्द्यावर अनेक याचिकाही न्यायालयात प्रलंबित आहेत. अशातच, राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मथुरेबाबत एक सूचक विधान केले आहे. बरसाना येथे बोलताना योगी म्हणाले की, 'आम्ही अयोध्येला एक सुंदर शहर बनवले. प्रयागराजही सूर्याप्रमाणे चमकतोय. आता मथुरेची बारी आहे.' मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याने नवीन चर्चांना उधाण आले आहे.



सीएम योगी मथुरा येथील बरसाणाच्या रंगोत्सव कार्यक्रमात सहभागी झाले होते. येथे आजपासून रंगोत्सवाला सुरुवात झाली आहे. लठमार होळीपूर्वी आजपासून येथे फुलांची होळी साजरी केली जाते.

कार्यक्रमात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, 'महाकुंभाच्या भव्य कार्यक्रमानंतर आज मी होळीच्या शुभेच्छा देण्यासाठी आणि राधा-राणीचा आशीर्वाद घेण्यासाठी येथे आलो आहे. आपली ब्रजभूमी ही भारतातील सनातन धर्मावरील अथांग भक्तीची भूमी आहे. आपले सौभाग्य आहे की, बाबा विश्वनाथांचे निवासस्थान काशी आहे. मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांचे पवित्र जन्मस्थान अयोध्या आणि लीलाधारी श्री कृष्णाची जन्मभूमी मथुरा, वृंदावन आणि बरसाना आपल्याच राज्यात आहे.'

सीएम योगी पुढे म्हणतात, 'अयोध्या-काशीनंतर आता यमुनामातेची बारी आहे. यमुनामातेला सांगायला आलोय की, आता दिल्लीतही रामभक्तांचे सरकार आले आहे. त्यामुळे समजून जा की, गंगेच्या धर्तीवर यमुनादेखील लवकरच शुद्ध होईल. आता ती वेळ फार दूर नाही, त्यामुळे थोडी वाट पाहा...' असेही योगी यावेळी म्हणाले.

## सुरेश भटांची गझल आणि जयंत पाटलांना टोला
## विधानसभेत देवेंद्र फडणवीसांच्या टिप्पणीवर पिकला हशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत चालू असून त्यात वेगवेगळ्या मुद्द्यांवरून सत्ताधारी व विरोधी पक्षांमध्ये कधी कलगीतुरा, कधी खडाजंगी तर कधी सहमती पाहायला मिळत आहे. अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी धनंजय मुंडेंनी राजीनामा दिल्यामुळे सुरुवात वादळी झाली. आज त्याच राजीनाम्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला न सांगता माध्यमांना सांगितलं यावरून विरोधकांनी सरकारला घेरलं. यानंतर दुपारी राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावण्यासाठी प्रसिद्ध मराठी गझलकार सुरेश भट यांची एक गझल ऐकवताच सभागृहात तुफान हशा पिकला!




**महावितरणला शेअर मार्केटमध्ये लिस्ट करणार**

देवेंद्र फडणवीसांनी यावेळी महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या अवस्थेवर भाष्य करताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व आमदार जयंत पाटील यांच्यावर खोचक टिप्पणी केली. आपण शेतकऱ्यांकडून मागच्या काळात वीजबिल वसूल न केल्यामुळे आपल्या सरकारी कंपनीवर ७५ हजार कोटींचं कर्ज आहे. पण ते हळूहळू आपण व्यवस्थित करू. आपला प्रयत्न असा आहे की सरकारनं थोडा पाठिंबा दिला तर देशात आपली पहिली वीज कंपनी असेल जी आपण स्टॉक मार्केटमध्ये लिस्टिंग करू आणि तिथून आपण पैसे उभे करू. हा आपला प्रयत्न आहे. त्या दिशेनं आपलं काम चालू आहे, असं फडणवीस म्हणाले.यासाठी कंपनीचं व्हॅल्युएशन चालू असल्याचं फडणवीसांनी सांगताच समोर बसलेल्या जयंत पाटील यांनी त्या वेळी तुमच्या मनात होतं, पण झालं नाही. २००३ सालीही त्याचं व्हॅल्युएशन झालं होतं, असं सांगितलं. तेव्हा सत्तेत असलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारचा संदर्भ देत यावर देवेंद्र फडणवीसांनी जयंत पाटलांना टोला लगावला.

जयंतराव तुमचा प्रॉब्लेमच तो आहे की तुम्ही चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी राहता आणि चुकीच्या गोष्टी सांगता. योग्य गोष्टी योग्य लोकांसोबत योग्य वेळी सांगितल्या तर त्या कार्यान्वित होतात, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. यावर बाजूला बसलेल्या अजित पवारांनी लागलीच माझ्यासारखं करत नाहीत ते, असं म्हणताच सभागृहात मोठा हशा पिकला. त्यावर फडणवीसांनीही लागलीच तुम्ही दादांचं ऐकत नाहीत आणि माझंही ऐकत नाहीत हा तुमचा प्रॉब्लेम आहे, अशी पुस्ती जोडली आणि पुन्हा हशा पिकला!

## कामांना स्थगिती द्यायला मी काय उद्धव ठाकरे आहे का : फडणवीसांची टोलेबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळातील काही निर्णयांना स्थगिती दिल्याची व त्यांच्या कार्यकाळातील कामांची चौकशी सुरू करण्यात आल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात आहे. तसेच तानाजी सावंत यांच्या कार्यकाळातील तब्बल ३१९० कोटींच्या कामांना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्याचंही बोललं जातं. आता या चर्चांवर आता अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य करत या सर्व चर्चा फेटाळून लावल्या आहेत. तसेच विकास कामांना स्थगिती द्यायला मी काय उद्धव ठाकरे आहे का? असा सवाल करत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे.



गेल्या काही दिवसांपासून माध्यमांची एक आवडती बातमी झाली आहे. काही झालं की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी एकनाथ शिंदे यांच्या कामांना स्थगिती दिली. पहिल्यांदा हे लक्षात घेतलं पाहिजे की, कामांना स्थगिती देण्यासाठी मी काही उद्धव ठाकरे नाही. याआधीही मी स्पष्ट केलं आहे की जे राज्याच्या हिताचं आहे ते काम सुरु करत असताना एकनाथ शिंदे यांच्याबरोबर मी देखील होतो, त्यानंतर अजित पवार हे देखील आले. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात जे निर्णय घेतले, त्या निर्णयांची जबाबदारी फक्त एकनाथ शिंदे यांची नाही, तर आमच्या तिघांचीही जबाबदारी आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.मी एक गोष्ट माध्यमांना आणि विरोधकांनाही सांगतो. हे समन्वयाने चालणारं सरकार आहे. या सरकारमध्ये सर्व निर्णय आम्ही तिघंही मिळून घेतो. आता काही बैठकांना आम्ही तिघं असतो, काही बैठकीला मी असतो किंवा काही बैठकीला अजित पवार असतात. मग एखाद्या बैठकीला कोणी गैरहजर असलं की लगेच तो नाराज, मला असं वाटतं की सध्या कॉलिटीच्या बातम्याही दिसत नाहीत आणि विरोधकांना कॉलिटीची टीका करता येत नाहीये, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## औरंगजेब हा धर्मांध, क्रूर शासक आणि या देशाचा लुटारू; त्याची कबर उखडून टाकावी; उदयनराजे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७सातारा**

औरंगजेब हा धर्मांध, क्रूर शासक आणि या देशाचा लुटारू होता. छत्रपती शिवाजी महाराजांना त्रास देणाऱ्या, छत्रपती संभाजी महाराजांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करणाऱ्या या औरंगजेबाच्या कबरीचे या महाराष्ट्रात उदात्तीकरण, दैवतीकरण सुरू आहे. त्याचे इथे उरूस भरवले जात आहेत हे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. हे प्रकार कायमचे रोखण्यासाठी औरंगजेबाची ही कबरच उखडून टाकली पाहिजे असे मत छत्रपती शिवाजी महाराजांचे तेरावे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.

औरंगजेबाचे पूर्वज हे बाहेरून आलेले लुटारू, धर्मांध आणि आक्रमक असल्याचे सांगत उदयनराजे म्हणाले, की या औरंगजेबाने या देशातील प्रत्येक राजवटींना त्रास दिला, रयतेवर अत्याचार केले. धर्मांतरे घडवली. स्वतःच्या राजकीय



महत्वकांक्षेतून सख्ख्या भावांची त्याने हत्या केली, वडलांना कैदेत टाकले, इथली मंदिरे, देवांवर त्याने हल्ले केले, आमची संस्कृती नष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केला. तो आणि त्याचे पूर्वज हे फक्त हा देश लुटण्यासाठी आले होते. त्यांनी इथला देव, देश आणि धर्म बुडवण्याचे काम केले. असा हा माणूस आमच्यासाठी आदर्श कसा होऊ शकतो ? छत्रपती शिवाजी महाराजांना ज्याने त्रास दिला, त्यांचा अपमान केला. छत्रपती संभाजी महाराजांची ज्याने अत्यंत निर्दयीपणे हत्या केली. असे असताना या क्रूरकर्मा औरंगजेबाची कबर या महाराष्ट्रात कशाला हवी. उलट त्या जागी एका क्रूर व्यक्तीच्या शेवटची ही जागा असेच स्मरण करून द्यायला हवे.असे खासदार उदयनराजे भोसले म्हणाले. औरंगजेबाचा गौरव करणाऱ्या पिलावळीने हे प्रकार थांबवावेत अन्यथा त्यांनी औरंगजेबाच्या मूळ देशात चालते व्हावे असा इशाराही उदयनराजे यांनी या वेळी दिला.दरम्यान महापुरुषांविषयी वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्याविरोधात तातडीने कायदा करण्याच्या मागणीचाही उदयनराजे यांनी पुनरुच्चार केला.यावेळी सुनील काटकर, काका धुमाळ, प्रीतम कळसकर, विनीत पाटील आदी उपस्थित होते.

## राज्याची आर्थिक परिस्थिती गंभीर! अर्थमंत्री अजित पवारांनी अहवाल मांडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून विदेशी गुंतवणुकीचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. विरोधकांनी महाराष्ट्रातील गुंतवणूक दुसऱ्या राज्यात, विशेषत: गुजरातमध्ये गेल्याचा दावा केला. त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील रोजगाराचं मोठं नुकसान झाल्याचंही नमूद केलं. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला यामुळे फटका बसल्याचं बोललं गेलं. नव्या सरकारचा अर्थसंकल्प ९ मार्च रोजी अधिवेशनात मांडला जाणार आहे.

सन २०२४-२५ च्या अंदाजानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सन २०२३-२४ च्या तुलनेत ७.३ टक्के वाढ अपेक्षित असून देशाच्या अथर्व्यवस्थेमध्ये ६.५ टक्के वाढ अपेक्षित आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास दर ७.३ टक्के राहील असा अंदाज आर्थिक पाहणी अहवालात वर्तवण्यात आला असून, त्यात सर्वाधिक कृषी क्षेत्राचा विकास ८.७ टक्के,



उद्योग क्षेत्राचा विकास ४.९ टक्के तर सेवा क्षेत्राचा विकास ७.८ टक्के असेल असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे. राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्याचं २०२४-२५ चं स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी इतकं नमूद करण्यात आलं आहे.२०२४-२५ साठी राज्याचा महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी तर २०२३-२४ साठीचा सुधारित खर्च अंदाज ५ लाख ०५ हजार ६४७ कोटी आहे. २०२४-२५ साठी भांडवली उत्पन्नाचा वाटा २४.१ टक्के तर भांडवली खर्चाचा हिस्सा २२.४ टक्के इतका आहे. २०२४-२५ साठी वित्तीय तूट २.४ टक्के तर महसुली तूट ०.४ टक्के इतकी अंदाजित करण्यात आली आहे. महत्वाचं म्हणजे काही दिवसांपूर्वीच लाडकी बहीण योजना आली. त्यावेळी विरोधकांसह काही आर्थिक तज्ञांनीही यामुळे अर्थसंकट येईल असं मत मांडलं होत. दरम्यान, आर्थिक अहवाल पाहता. यामध्ये सत्यता आढळून येत आहे.

## शाबासकी नको, पण बदनामी करू नका एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ मुंबई**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत बोलताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर चांगलेच तोंडसूख घेतले. विरोधकांनी आम्हाला शाबासकी देऊ नये, तसेच बदनामही करू नये. फितरत हमारी सहन करने की न होती, तो हिंमत आपकी बोलने की ना होती, असा शेर ते यासंबंधी आपल्या अंदाजात म्हणाले. कोरटकर असो किंवा सोलापूरकर सरकार महापुरुषांचा अवमान करणाऱ्या कुणालाही सोडणार नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



एकनाथ शिंदे राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना म्हणाले की, राज्यपालांनी महाराष्ट्राचे सुस्पष्ट चित्र राज्यापुढे मांडले. आम्ही विक्रमी बहुमताने निवडून आलो. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आमची दमदार वाटचाल सुरू आहे. पण विरोधकांची कॅसेट उद्योग बाहेर गेल्यावरच अडकली आहे. विरोध भय्याजी जोशी यांच्या विधानाचे राजकारण करत आहेत. त्यांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरणही दिले आहे.

**शाबासकी नको, बदनामी करू नका**

एकनाथ शिंदे यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता त्यांना टोला हाणला. ते म्हणाले, २०१९ मध्ये सत्तेसाठी कुणी काय केले हे सर्वश्रूत आहे. वडिलांची छत्रछाया सोडून शत्रूंशी हातमिळवणी केली. काही नेते टूरिस्ट म्हणून येतात व जातात. पायऱ्यांवर चॅनेलचे बूम पाहून धूम ठोकतात. पण फितरत हमारी सहन करने की न होती, तो हिंमत आपकी बोलने की ना होती... अडीच वर्षांत आम्ही केलेली कामे लक्षात घ्या व पुढील ५ वर्षांचा अंदाज बांधा. आम्हाला तुमची शाबासकी नको, पण आमची बदनामी करू नका.

## पाईपचे १५ तुकडे , पोटावर बेदम मारहाण, नाकामधून रक्त अन् संतोष देशमुखांचा पीएम अहवाल समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७बीड**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्याचे राजकारण चांगेलच तापले आहे. या प्रकरणात पोलिसांनी वाल्मिक कराड याला क्रमांक एकचा आरोपी केला आहे. मात्र आता देखील या प्रकरणात एक आरोपी फरार आहे. नुकतंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. तर आता संतोष देशमुख यांचा झच् अहवाल समोर आला आहे. या अहवालात अनेक धक्कादायक खुलासे करण्यात आले आहे.

देशमुखांच्या डाव्या खांद्यावर तीव्र जखमा, दंड, कोपर, मनगट, हाताच्या मुठींवर



जखमा होत्या. मारहाणीमुळे जखमा काळ्या निळ्या झाले होते. संपूर्ण पाठ काळीनिळी झाली होती, त्यांच्या शरीरातील रक्त साखळले होते. इतक्या निर्दयीपणे संतोष देशमुखांना मारहाण झाली असं या अहवालामध्ये म्हटले आहे. याचबरोबर देशमुख यांना ज्या पाईपणे मारहाण करण्यात आली त्याचे १५ तुकडे झाले होते. पोलिसांना महेश केदार याच्या मोबाईलमध्ये देशमुख यांना मारहाण करतानाचे व्हिडीओ आणि जखमी अवस्थेतील फोटो सापडले आहे.तपासात सीआयडीने पाच मोबाईल जप्त केले आहे. संतोष देशमुखांना मारहान करताना त्यांचे कपडे देखील काढण्यात आले होते. तसेच आरोपींनी यावेळी मोकारपंती या व्हॉट्सअप ग्रुपवर व्हिडीओ कॉल देखील केला होता. अशी देखील माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्या अशी मागणी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांकडून करण्यात येत आहे.

## संपादकीय ......

# सोयाबीन दराची चिंता

सोयाबीनचे भाव पडल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी चिंताक्रांत झाला आहे. राज्याच्या अवर्षणप्रवण भागांत सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. त्यामुळे मराठवाडा, विदर्भासह कमी पावसाच्या अन्य जिल्ह्यांतही या पिकाला शेतकर्यांची पसंती आहे; मात्र कापसासारख्या काही पिकांच्या बाबतीत नेहमीच घडत आले, ते सोयाबीनच्याही बाबतीत घडते. उत्पादन भरपूर झाले की, भाव पडतात; इतके की उत्पादन खर्चही निघत नाही. सरकार भाव जाहीर करते; पण व्यापारी तेवढा भावही देत नाहीत. यंदा केंद्र सरकारने प्रतिक्विंटल ४,८९२ रुपये हमीभाव जाहीर केला. गतवर्षापेक्षा तो २९२ रुपयांनी जास्त आहे. त्यासाठी आर्द्रतेची अट घातली. बाजारात चांगला भाव मिळण्यासाठी सरकारने आयात शुल्कात २० टक्के वाढही केली. त्यामुळे दर २०० ते ३०० रुपयांनी वाढले; पण नंतर ते पुन्हा घसरले. ऑक्टोबरमध्ये राज्यात सोयाबीनला सरासरी ३,७५० ते ४,१०० रुपये दर मिळाला. म्हणजेच हमीभावापेक्षा सरासरी ७०० ते १००० रुपये प्रतिक्विंटल कमी दरात शेतकर्यांना सोयाबीन विकावे लागले.गेल्या तीन वर्षांपासून देशातील सोयाबीनचे भाव सतत पडत आहेत. मार्च २०२३ मध्ये ५,५००, मार्च २०२४ मध्ये ४,६०० आणि आता मार्च २०२५ मध्ये सोयाबीनचे भाव ४,१०० रुपयांवर आले आहेत. हे दर आंतरराष्ट्रीय पातळीवर मागणी आणि पुरवठ्यावर ठरतात. ब्राझील , अमेरिका, अर्जेंटिना हे देश सोयाबीनचा पुरवठा करतात. या देशांत २०२४-२५ मध्ये सोयाबीनचे विक्रमी उत्पादन झाले आहे. जागतिक पातळीवर ३५० दशलक्ष टन उत्पादन असायचे, ते यंदा ३९४ दशलक्ष टन झाले. शिवाय, मागणी असलेले जे देश आहेत, त्यात चीनकडून एकूण उत्पादनाच्या ६५ टक्के मागणी होत असते. ती गेल्या पाच वर्षांपासून वाढलेली नाही. ९० ते १०० दशलक्ष टन एवढी ही मागणी आहे. यंदा मागणीपेक्षा पुरवठा जास्त असल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दर घसरले. त्याचा परिणाम देशांतर्गत बाजारपेठेवरही झालेला आहे.

सोयाबीन उत्पादनात भारताचा जगात पाचवा क्रमांक लागतो. जगाच्या उत्पादनाच्या तुलनेत भारतात सोयाबीनचे ३ टक्के उत्पादन घेतले जाते. यंदा देशातील सोयाबीनचे उत्पादन ६ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. त्यालाही कारणे आहेत. कमीत कमी पाण्यावर येणारे हे पीक असून, त्याच्या मशागतीलाही फारसा खर्च येत नाही. महाराष्ट्रात या पिकाखालील क्षेत्र ४१ लाख हेक्टर आहे; पण यंदा ५१ लाख हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली. त्यामुळे उत्पादनात भर पडली. तिही अशावेळी जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात दर पडलेले आहेत. या हंगामात सोयाबीनचा दर आंतरराष्ट्रीय बाजारात जास्तीत जास्त ३,३०० ते ३,५०० रुपये प्रतिक्विंटल राहणार आहे. त्याचा परिणाम म्हणून भारतीय बाजारपेठेत हा दर जास्तीत जास्त ४,७०० ते ४,८०० पर्यंत जाईल. केंद्राच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात १५ ऑक्टोबरपासून २०९ खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली. त्या केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी करण्यास आणि शेतमाल विकण्यास शेतकरी निरुत्साही आहेत. याची दोन कारणे आहेत. खरेदी केंद्रे शेतापासून साधारण ३५ ते ४० किलोमीटर अंतरावर आहेत. तिथे माल विकल्यानंतर त्याचा मोबदला हातात कधी पडेल, याची शाश्वती नाही.


अशा परिस्थितीतही शेकडो शेतकर्यांनी रांगा लावून सोयाबीन या केंद्रांकडे नेला; पण तेथे आर्द्रता पाहून वर्गवारी ठरविली जात असल्यामुळे नुकसान होण्याची भीती शेतकर्यांमध्ये आहे. यापेक्षा व्यापार्यांकडे सरसकट एकाच दरात सोयाबीन विकता येते आणि त्याचा मोबदलाही लगेचच हातात पडतो. काढणीच्या काळात पाऊस झाल्यामुळे सोयाबीनमध्ये आर्द्रता मर्यादेपेक्षा १० ते १५ टक्के जास्त राहिली. त्यामुळे व्यापार्यांची नव्या सोयाबीनपेक्षा गेल्यावर्षीच्या सोयाबीनला जास्त पसंती आहे. आर्द्रतेमुळे सोयाबीनला प्रतिक्विंटल ३०० ते ४०० रुपयांचा फटका बसत आहे. सोयाबीनचा भाव वाढण्याची शक्यता ३१ डिसेंबर ते ३१ जानेवारीदरम्यान असते. या टप्प्यात ज्यांनी सोयाबीन विकले नाही, त्या शेतकर्यांपुढे संकट उभे राहिले. अर्थात, केंद्र सरकारने ६ फेब्रुवारीपर्यंत नाफेडची खरेदी केंद्रे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला होता; मात्र मुदतवाढ देण्याच्या मागणीसाठी राज्यभरात आंदोलन उभे राहिले. त्यामुळे राज्य सरकारने केंद्राकडे मुदतवाढ देण्याची विनंती केली. त्यानुसार सरकारी खरेदीला २४ दिवसांची मुदतवाढ दिली आहे.

वास्तविक, खरेदी केंद्रांची पहिली मुदत १२ जानेवारीपर्यंतच होती. ती ३१पर्यंत वाढविण्यात आली, तरीही शेतकर्यांच्या रांगा कमी झाल्या नाहीत. त्यामुळे ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली गेली. या मुदतीत देशभरात १९.९९ लाख टन सोयाबीन खरेदी करण्यात आले. त्यात महाराष्ट्रातून खरेदी झालेले सोयाबीन ११.२१ लाख टन असून, त्याला ४,८९२ रुपये दर देण्यात आला. केंद्रांवरील सोयाबीन खरेदीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात पहिल्या स्थानावर आहे.केंद्र सरकारने सोयाबीन खरेदीसाठी हात मोकळा ठेवला आहे. आर्द्रतेची अट काढून टाकली आहेच शिवाय शेतकर्यांच्या मागणीनुसार खरेदीत वेळोवेळी मुदतवाढ देण्याचे धोरण स्वीकारले. राज्य सरकारने सोयाबीनला ७ हजार ७७ रुपये प्रतिक्विंटल आणि कापसाला १० हजार ५७९ रुपये भाव मिळावा, अशी शिफारस केली होती. तिही केंद्राच्या विचाराधीन आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादन वाढल्यामुळे शेतकर्याला अपेक्षेनुसार भाव मिळालेला नाही.

# अमरावती येथील विमानतळाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव देण्याची मागणी!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मोर्शी –** अमरावती येथून विमानसेवा सुरू होण्याच्या दृष्टीने अमरावती विमानतळाची प्रलंबित कामे लवकरच पूर्ण करून अमरावतीमध्ये अत्याधुनिक विमानतळ निर्माण होण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी मिशन मोडवर कामे पूर्ण करून प्रकल्प पूर्णत्वास न्यावा व अमरावती विमानतळाला वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



महाराष्ट्रातील अमरावती जिल्हा संत परंपरेचे वैभव म्हणून ओळखले जात असून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखले जाते. अंधश्रद्धा निर्मूलन, जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. तुकडोजी महाराजांनी १९३५ साली मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते.तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाराष्ट्रभरच नव्हे तर देशभर फिरून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक झाली होती. आते है नाथ हमारे हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते. भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल, याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूतस्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही सुचविली. या उपाययोजना त्यांच्या काळाला तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या. हे आज (त्यांनी आपली जीवनयात्रा संपल्यानंतरच्या काळातही) तीव्रतेने जाणवत असल्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव देश-विदेशात होत आहे. अशा महान विभूतींच्या कार्याचे चिरंतन स्मरण राहावे, यामुळे अमरावती येथील बेलोरा विमानतळाला वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी शासनाकडे केली आहे.

# गव्हाची साठवणूक करताना 'या' गोष्टी लक्षात ठेवा

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक –** गहू अधिक काळ चांगल्या स्थितीत राहण्यासाठी गव्हाची व्यवस्थित साठवण करणे महत्त्वाचे असते. गहू साठवणुकीसाठी ओलावा, उंदीर, पक्षी आणि घाणीपासून मुक्त अशा सुरक्षित जागेची निवड करावी.

गहू साठवणुकीसाठी धातूच्या पत्र्यापासून अथवा सिमेंटपासून बनविलेल्या सुधारित कोठ्यांचा वापर केल्याने कीड, उंदीर किंवा ओलाव्याचा प्रादुर्भाव होत नाही. तसेच आवश्यकता पडल्यास या कोठारामधील धान्याला विषारी वायूची धुरी देणे शक्य असते.

पोत्यात गव्हाची साठवणूक करताना पोती स्वच्छ साफ करूनच त्यात धान्य भरावे. धान्य भरलेली पोती लाकडी फळ्या अथवा पॉलिथिनच्या चादरीवर ठेवावीत. असे केल्याने गव्हाची जमिनीतील ओलाव्यामुळे जी नासाडी होते ती होत नाही. बाजारात पोत्याच्या आकाराच्या पॉलिथिनच्या पिशव्या मिळतात, अशा पिशव्या पोत्यात घालून नंतर त्यात धान्य भरले तर धान्य अधिक काळ सुरक्षित राहते.






अशी घ्या काळजी

साठवलेल्या गव्हातील किडींच्या नियंत्रणासाठी २० मि.ली. मेलिथिऑन (५०% प्रवाही) प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

दर १०० चौरस मीटर जागेसाठी ३ मि.ली. मिश्रण फवारणीसाठी वापरावे.

तसेच ३० ग्रॅम प्रति क्विंटल या प्रमाणात सेल्फॉस भुकटीचा बंद कोठारात वापर करावा.





साठवलेल्या गव्हाची उंदीर मोठ्या प्रमाणात नासधूस करतात, ते टाळण्यासाठी विषारी अमिषाचा प्रत्यक्षात वापर करण्यापूर्वी २ ते ३ दिवस भरडलेल्या धान्यात थोडेसे गोडेतेल मिसळून उंदरांना आकर्षित करावे.

नंतर १ भाग झिंक फॉस्फाईड + ५० भाग भरडलेले धान्य + पुरेसे गोडेतेल असलेल्या अमिषाचा वापर करून उंदरांचा बंदोबस्त करावा.




साठवलेल्या गव्हाचा पुढील हंगामात बियाणे म्हणून वापर करावयाचा असल्यास साठवणुकीदरम्यान प्रत्येक पोत्यात १ किलो वेखंड पावडर टाकावी.

– डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त शास्त्रज्ञ, कृषी विद्यापीठ






# रंगीबेरंगी बर्फ गोळा खातायेत, सावधान !

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

वाढत जाणाऱ्या गरमीने अंगाची लाही होत असताना रंगीबेरंगी बर्फगोळा खाण्याची अनिवार इच्छा बालकांनाच नव्हे तर मोठ्यांनाही अनावर करते. मात्र बर्फ निर्मिती वापरले जाणारे पाणी, तेथील स्वच्छता आणि गोळ्यावर टाकले जाणारे रासायनिक रंग यामुळे जुलाब, अजीर्ण, पोटाचे आजार, तोंड येणे भूक मंदावणे हे आणि अन्य आजाराला बळी पडण्याची शक्यता असते.



उन्हाची काहिली वाढताच रस्ते, चौक, गल्लीबोळात लालचुटुक, निळे, हिरवे रंगांचे बर्फ गोळे विक्रेत्यांची गर्दी दिसून येते. बर्फ खाण्याचा मोह बालकांसह मोठ्यांनाही आवरता येत नाही. मात्र बर्फासाठी वापरले जाणारे पाणी 'शुद्ध' आहे. का बर्फ निर्मिती करणाऱ्या कारखान्यांची स्वच्छता आणि बर्फाचा गोळा करुन त्यावर शिंपडले जाणारे रंग किती खाण्याजोगे आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधल्यास ती नकारात्मक येऊ शकतात.

बर्फ करणाऱ्या कारखान्यात वापरले जाणारे पाणी दुषित असल्यास आणि तेथील कामगारांची वैयक्तिक स्वच्छता नसल्यास दुषित पाणी, अस्वच्छ जागा अन् दुषित हातामुळे जुलाब, अजीर्ण. भूक मंदावणे, फुस्फुसाचे आजार उद्भवू शकतात. बर्फ स्पर्शाने गरम असला तरी त्याचा गूण उष्ण आहे. त्यामुळे बर्फाचे खाणे जिभेला फोड आणणारेही ठरू शकते. यासह खाणाऱ्याची भूक मंदावणे, दाताच्या समस्या, कफ वाढणे असे आजारही होऊ शकतात. त्यामुळे बर्फगोळे कुठे, कशा पाण्याने तयार होत आहेत, हे जाणल्याशिवाय खाणे म्हणजे आजाराला निमंत्रण ठरु शकते.

'या' शक्यतामुळे आरोग्य धोक्यात..१) बर्फ गोळा गाडा रहदारीच्या ठिकाणी असल्यास प्रदुषण, धुळचा प्रादुर्भाव२) विक्रेत्याचे हात अस्वच्छ असल्यामुळे पसरणारे संसर्ग ३) गोळ्यासाठी वापरली जाणारी काडी अस्वच्छ असल्यास धोके

# जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना बालस्नेही पुरस्कार

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने केला सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे 'बालस्नेही पुरस्कार २०२४' अंतर्गत उत्कृष्ट जिल्हाधिकारी म्हणून सौरभ कटीयार यांना बाल हक्कांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबई येथे गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे यांच्या हस्ते गुरुवार(ता.६) रोजी शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात बालकांच्या हक्कांसाठी अनेक प्रभावी योजना राबवण्यात आल्या आहेत. विशेषतः बालविवाह प्रतिबंध, बालकामगार निर्मूलन आणि शिक्षण हक्कांच्या अंमलबजावणी साठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, खोयजमा खुरम, अनिरुद्ध उगले, संजय तायडे, शुभम मेश्राम, नकुल नाईक, अर्चना रक्षे यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

**अमरावतीकरांना समर्पित– जिल्हाधिकारी**

पुरस्कार संपूर्ण टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे.पुरस्कार अमरावतीकराना समर्पित करीत आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झालं आहे. भविष्यातही बालकांच्या कल्याणासाठी कार्यरत राहणार असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले.



# रुग्णालयात उष्माघात कक्ष व सुविधा सुसज्ज ठेवाव्या – जि. प. मुख्य कार्य. अधिकारी बी. वैष्णवी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अकोला–** जिल्ह्यात उन्हाचा पारा वाढत असून, रूग्णालयांनी सुसज्ज उष्माघात कक्ष, शीतगृह, मुबलक औषध साठा, रूग्णवाहिका आदी व्यवस्था सुसज्ज ठेवण्याचे निर्देश जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी यांनी दिले.

वातावरणीय बदल व मानवी आरोग्य कार्यक्रमाच्या जिल्हास्तरीय समितीची बैठक बुधवारी श्रीमती वैष्णवी यांच्या दालनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, डॉ. आशिष गि-हे आदी उपस्थित होते.

जिल्ह्याचा हवा गुणवत्ता निर्देशांक फेब्रुवारी महिन्यात १४२ पर्यंत गेला असून, ऑक्टोबर ते मार्च या सहा महिन्यात प्रदूषण वाढल्याचे दिसते. अशा वातावरणात नागरिकांत श्वसनाचे आजार वाढतात. त्यामुळे त्यादृष्टीने उपाययोजना व्हावी. वाढता उन्हाळा लक्षात घेता रूग्णालये सुसज्ज ठेवावी व नागरिकांमध्ये उष्माघातापासून बचावासाठी जनजागृती व्हावी, असे निर्देश श्रीमती वैष्णवी यांनी दिले.

अशी घ्यावी काळजी

उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी. तशी लक्षणे आढळल्यास वेळीच उपचार घ्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी व प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

उन्हात शारीरिक श्रमाची, मजुरीची कामे फार वेळ करणे, कारखान्याच्या बॉयलर रूममध्ये काम करणे, काच कारखान्यात काम, जास्त तापमानाच्या खोलीत काम, घट्ट कपड्याचा वापर, अधिक उष्णतेशी संबंध टाळावा. पाच वर्षांखालील मुले, वृद्ध, गर्भवती माता, दुर्धर आजारी व्यक्ती यांची विशेष काळजी घ्यावी.

उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रूग्णाच्या शरीराचे तापमान कमी करण्यासाठी जवळच्या रूग्णालयात उपचार घ्यावे. शरीराला घाम येणे, तहान लागणे, शरीर शुष्क होणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, चक्कर येणे, निरूत्साही वाटणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बैचेनी, अस्वस्थता, बेशुद्ध अवस्था, वांती होणे अशी लक्षणे उष्माघाताची असू शकतात.

हे करा

डोक्याला रूमाल, टोपी, छत्री वापरा.

सौम्य रंगाचे सुती कपडे वापरा.

दुपारी १२ ते ४ या वेळेत घरात राहावे.

उन्हातून आल्यावर चेह-यावर ओला कपडा ठेवा.

थेट सूर्यप्रकाश अंगावर घेऊ नका.

पुरेसे पाणी प्या. ताक, लिंबू, नारळपाणी असे द्रव्य पदार्थ प्यावेत.

हे करू नका

भरउन्हात शारीरिक कष्टाची कामे टाळा.

उन्हात अनवाणी चालू नका.

लहान मुलांना, पाळीव प्राण्यांना आत ठेवून गाडी बंद करू नका.

मद्य, चहा, कॉफी, अतिसाखर असलेल्या कार्बोनेटड द्रव्याचे सेवन टाळा.

दुपारी २ ते ४ या वेळेत स्वयंपाक टाळा.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ७ मार्च २०२५

शहर/ग्रामिण


# मेळघाटात आगीचा तांडव सुरूच....

## चिखलदऱ्याच्या लवादा गावात घराला आग

## आदिवासींनी घरातील पाणी आणून विझविली आग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७चिखलदरा** – कडक उन्हाळा सुरू झाल्याने मेळघाटातील विविध भागात आगीच्या घटना लागत असल्याने प्रशासनाची चिंता वाढली – आहे. धारणी सोल प्रोजेक्टसह चार्कदा गावात लागलेलया आगीच्या घटनेची ओरड शांत होत नाही तोच आता... चिखलदरा तालुक्यातील लवादा गावात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास एका आदिवासीच्या घरातील धुऱ्याला आग लागली. परंतु, चिखलदरा नपंच्या अग्निशमण विभागाचे वाहन ३० मिनिटेउशिरा आल्याने आदिवासी गावकऱ्यांनी आपआपल्या घरात साठविलेले पाणी आणून आगीवर नियंत्रण मिळविले. अन्यथा अर्ध्या पेक्षा जास्त गावातील घरे आगीच्या विळख्यात आली असती लवादा गावातील दत्तुजी रामजी येवले (५५) हे त्यांच्या घरातील पाळीव पशूसाठी




गावालगतच्या शिवारात चाराआणण्यासाठी गेले होतेअशातच अचानक त्यांच्या घरातील धुऱ्याला आग लागल्याने गावात एकच खळबळ उडाली. याबाबत कळताच दत्तजी येवले तातडीने घरी धावत आले. गावातील काही लोकांनी चिखलदरा अग्निशमण विभागाला माहिती दिली. परंतु, बराच वेळ होऊनही अग्निशमणचे वाहन न आल्याने गावकऱ्यांनी आपआपल्या घरात लहान-मोठ्या भांड्यांमध्ये साचविलेले पाणी आणून आगीवर पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. अन्यथा आग पसरली असता गावातील अर्ध्यापेक्षा जास्त घरे आगीच्या विळख्यात येऊन मोठ्या प्रमाणात वित्त व जिविताची, प्राण्यांच्या जिवाची हानी झाली असती. या आगीत दत्तुजी येवलेंचे सुमारे ३० ते ४० हजाराचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. दरम्यान अग्निशमण दलाच्या वाहनाने घटनास्थळी येऊन आगीवर पाण्याचा मारा केला. दत्तुजी येवले यांच्या घरावरून विजेचातार गेला असल्याने शॉक सर्कीट होऊन आगीचा गोळा किंचा चिंगारी खाली पडल्याने ही आग लागली असल्याचे समजते. याबाबत कळताच चिखलदराचे तहसिलदार जीवन मोराणकर यांनी तात्काळ संबधीत पटवारीला दत्तुजी येवले यांच्या घरी लागलेल्या आगीचा पंचनामा करण्याचे आदेशदिले. तरदुसरीकडे गावकऱ्यांनी उन्हाळा सुरू झाला असल्याने आगीवर तात्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमणच्या वाहन चालकाचे रिक्त असलेल्या पदावर तत्काळ चालकाची नियुक्ती करण्याची मागणी नपं मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.–

## पीएम किसानच्या लिंकवर क्लिक करताय? तर सावधान! मोठे नुकसान होण्याचा धोका



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** विविध तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर फसवणूक करणारे सर्वसामान्यांना जाळ्यात ओढत असतात. आता सायबर चोरट्यांनी फसवणूक करण्यासाठी नवा मार्ग शोधला आहे. 'पीएम किसान एपीके' नावाच्या फसव्या लिंकद्वारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यातून रक्कम काढून घेतली जात असल्याचे धक्कादायक प्रकार घडत असल्याचे समोर आले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये खळबळ उडाली. शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांनी सावधगिरी बाळगावी व कुठलीही अनाहूत लिंक उघडू नये, अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.

प्रलोभने दाखवून किंवा बनावट लिंक पाठवून ऑनलाइन फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. इंटरनेटच्या माध्यमातून आर्थिक फायदा घेण्यासाठी ऑनलाइन फसवणूक करण्याचे नवनवीन फंडे सायबर चोरट्यांनी शोधले. फसवणुकीसाठी नेहमीच वेगवेगळ्या क्लुप्त्या लढवत आहेत. गेल्या काही काळात अशी अनेक प्रकरणे समोर आली आहेत. यूपीआयद्वारे पेमेंट करताना वापरकर्त्यांना अज्ञात लिंकवर क्लिक करून त्यांची माहिती देऊन मोठ्या प्रमाणात पैसे गमवावे लागले. या फसवणुकीत गुन्हेगार आपल्या बँक खात्यात प्रवेश करून किंवा खोट्या ऑफरद्वारे पैसे हस्तांतरित करण्याचा प्रयत्न करतात. फिशिंग ईमेल, समाज माध्यमे, मोबाइल फोनवरील एसएमएस संदेश, बनावट तंत्रज्ञान समर्थन फोन कॉल, अनधिकृत खरेदी आदींच्या माध्यमातून गुन्हेगार ऑनलाइन फसवणूक करीत असतात. आता फसवणूक करण्यासाठी लिंकचा आधार घेतला जात आहे. फसव्या लिंकला टच केल्यानंतर मोबाइल हॅक होतो व 'पीएम किसान एपीके' अशी किंवा तत्सम लिंक शेतकऱ्यांच्या मोबाइलवर येते. ती उघडताच मोबाइल हॅक होतो. मोबाइल लिंक असलेल्या बँक खात्यातून पैसे काढले जातात, अशा स्वरुपाच्या घटना राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये घडल्या आहेत.यावर उपाय म्हणजे शेतकऱ्यांनी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. चुकून आपली फसवणूक झाल्यास त्वरित सायबर पोलिसांना कळवावे किंवा सीम कार्ड ताबडतोब काढून घ्यावे. अशी लिंक उघडल्यामुळे काही शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. अशा प्रकारच्या फसवणुकीची तक्रार करण्यास किंवा उपाययोजना करण्यास विलंब झाल्यास आर्थिक नुकसान भरून निघणे शक्य होत नाही. शेतकऱ्यांनी सावधगिरी बाळगावी व अशी लिंक मोबाइलवर आल्यास उघडू नये, अनावधानाने ती लिंक उघडल्यास फसवणूक टाळण्यासाठी किंवा फसवणूक झालेली रक्कम परत मिळवण्यासाठी सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## आदिवासी आश्रमशाळा ते अमेरिका...मेळघाट पुत्र डॉ. नितेश कास्देकर अमेरिकेत वैज्ञानिक

## थक्क करणारा प्रवास, संशोधक पुत्राचा गावाला अभिमान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६धारणी–**


मेळघाटातील धारणी जवळच्या चटवाबोड गावाचा आदिवासी विद्यार्थी डॉ. नितेशलाल कास्देकर यांना शासनाच्या विविध शिष्यवृत्त आणि शैक्षणीक सोयी सवलतींचा लाभ घ्ज्ञेत अमेरिकेत नोकरी प्राप्त केल्याने प्रकल्प अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमाने चर्चा करतांना शुभेच्छा दिल्या. डॉ. नितेच्या मेळघाट ते अमेरिका प्रवासाचे व यशचे अनुकरण इतर आदिवासी विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन एसडीओ म्हाडदळकर यांनी केले आहे.

धारणी तालुक्यातील लवादा गावातील संस्था चुन्नीलाल पटेल व्दारे संचालित आदिवासी आश्रमशाळा येथे शिक्षण घेणारे डॉ. नितेशलाल कास्देकर यांनी महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभागाच्या धारणी प्रकल्पाच्या माध्यमातने विविध सवलती आणि मार्गदर्शन प्राप्त करताना धारणी ते युएस असा शैक्षणिक प्रवास केला. सध्या ते अमेरिकेत ४० लाख रूपये रूपये वार्षिक पॅकेज प्राप्त करताना पेरस्ट डॉक्टरला रिसर्च असोसिएटयाउच्चपदावर सदस्य आहेत. आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रियवंदा म्हाडदळकर यांनी गौरवाने माहिती दिली. डॉ. नितेच्या विकासाच्या प्रवासात धारणी आदिवासी प्रकल्प कार्यालयाचा सिंहाचा वाटा असल्याने प्रियंवदा म्हाडदळकर यांनी थेट अमेरिकेत राहणाऱ्या डॉ. कास्देकर सोबत व्हीसीवर चर्चा करून त्याला शुभेच्छा दिल्या. या विषयी माहिती देतांना म्हाडदळकर यांनी मेळघाटातील इतर विद्यार्थ्यांनी डॉ. कास्देकरचा आदर्श डोळ्या समोर ठेऊन आदिवासी विकास विभागाच्या विविध शैक्षणीक सोयी, सवलतींचा लाभघ्यावा, असे आव्हान केले आहे.

धारणी तालुक्यातील छोटेसे गाव लवादा ते अमेरिकेतील जार्जिया विद्यापीठ पर्यंतची यशस्वी वाटचालक डॉ. कास्देकरने केल्यनो मेळघाटात एकच आनंदपसरलेले आहे. मेळघाटचा सर्वात मोठा सण म्हणजे होळी समोर असल्याने मेळघाट वासियांना डॉ. नितेचे यश एक तोहफा ठरत आहे. माहितीप्रमाणे, डॉ. नितेशने सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून मास्टर ऑफ सायन्स पदवी प्राप्त केलेली होती. २०१७ते च्या



कालावधित आयआयएसई आर मधून त्यांनी पीएचडी केली. २०२३ मध्ये त्यांनी अमेरिकेतील जार्जिया विद्यापीठ गाठून फार्मास्युटिकल आणि बायो मेडीकल सायन्समध्ये संशोधन सुरू केले. शिक्षण सुरू असतानाच डॉ. कास्देकरने पोस्ट डॉक्टरल रिसर्च असोसिएट पदावर कार्यरत झाले. शासनाच्या विविध शैक्षणीक सवलती घेऊनअमेरिकेत नोकरी करणारे डॉ. नितेश कास्देकर यांनी



आपल्या यशाबाबत धारणीच्या प्रकल्प कार्यालय व एसडीओ म्हाडदळकर यांना आभार पत्र पाठवून ध्यन्यवाद केले. आदिवासींच्याविकासासाठी प्रल्पक कार्यालय नेहम कटिबध्द असल्याचे सांगून प्रियंवदा मॅडम यांनी इतरांनी लाभघेण्याचे आवाहन केले आहे.

## दोन बायका...अन फजिती ऐका!!!, आते-मामे बहिणींशी बांधली लगीनगाठ

## अमरावती गेलेल्या पहिल्या पत्नीला आता येऊ नको, असा व्हीडीओ कॉल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.७अमरावती** : – एखाद्या 'ड्रामेबाज' चित्रपटाच्या कथानकाला शोभेल अशी घटना अकोला जिल्ह्यातून समोर आली आहे. एका तरुणाने चक्क आतेवमामे बहिणी असलेल्या दोन तरुणींशी गुपचुप लगीनगाठ बांधली. पहिल्या पत्नीला अंधारात ठेऊन पतीने दुसरीशी लग्न केले. नंतर अमरावती येथे गेलेल्या पहिल्या पत्नीला 'व्हिडिओ कॉल' करून आता येऊ नको, असे देखील नवरोबाने बजावले. त्यामुळे पायाखालची जमीन सरकलेल्या पहिल्या पत्नीने आपल्या पतीला दिवसाढवळ्या आकाशातील तारे दाखवले आहेत. दोन बायका करणाऱ्या नवरोबाची पोलीस ठाण्यातच झालेली फजिती काय विचारता? या प्रकरणाची शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे. चित्रपटांमध्ये अनेक वेळा पहिली पत्नी असतांना गुपचूपपणे दुसरे लग्न, ते लपवण्याची पतीची धडपड, त्यातून निर्माण होणारे विनोद व प्रकरण उघडकीस आल्यावर शेवटी होणाऱ्या धावपळीतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले जाते. अकोला जिल्ह्यात मात्र हा सर्व प्रकार प्रत्यक्षात घडला आहे. बार्शीटाकळी तालुक्यातील विझोरा गावातील तरुणाची २७ वर्षीय तरुणीसोबत एका लग्न समारंभात ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. त्या दोघांनी नऊ महिन्यांपूर्वी न्यायालयात लग्न केले. लग्न झाल्यावर देखील तरुणी शिक्षण घेत होती. तरुणीअमरावती



येथे बीएस.सी. चे शिक्षण घेत असल्याने ११ फेब्रुवारीपासून तिची परीक्षा होती. त्यामुळे ती अमरावती येथे राहण्यासाठी गेली होती. दरम्यानच्या काळात त्या तरुणाची पत्नीच्या मामे बहिणीसोबत ओळख झाली. सख्खी मामेबहीण असल्याने तिचे घरी नेहमीच येणे-जाणे होते. त्यातून दोघांमध्ये प्रेमसंबंध जुळले. तरुणाने पहिल्या पत्नीच्या मामे बहिणीशी दुसरे लग्न केले. लग्नानंतर पहिल्या पत्नीला पतीने 'व्हिडिओ कॉल' करून दुसऱ्या लग्नाची माहिती दिली आणि परत येऊ नको,' असे देखील फोनवरच बजावले. त्यामुळे पहिली पत्नी प्रचंड संतापली. तिने तातडीने अमरावतीवरून अकोला शहर गाठले.

पतीविरोधात तक्रार देण्यासाठी थेट सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात दाखल झाली. त्याच ठिकाणी पती व त्याची दुसरी पत्नी देखील पोहोचली पती व पहिल्या पत्नीमध्ये जोरदार वाद झाला.

दिवसाढवळ्या पोलीस ठाण्यातच संतापाच्या भरात पत्नीने पतीला चांगलाच चोप देण्यास सुरुवात केली. अखेर पोलिसांनी मध्यस्थी करून पहिल्या पत्नीला शांत केले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## कापूस उत्पादक शेतकऱ्यांची सीसीआय च्या ग्रेडर कडून फसवणूक होत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती:**विदर्भात प्रामुख्याने सर्वात जास्त पांढरं सोनं म्हणजे कापसाचे पीक घेतले जाते,मात्र आता याच अमरावती जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची शासकीय खरेदी करणाऱ्या सीसीआय च्या ग्रेडर कडून फसवणूक करण्यात येत असल्याचा आरोप शेतकऱ्यां नी केला आहे. अमरावती जिल्ह्या तील वरुड



तालुक्यात धागा येथे शासनाची सीसीआय मार्फत कापूस खरेदी सुरू आहे. मात्र या सीसीआय केंद्रावर शेतकरी कापूस घेऊन आल्यानंतर त्यांच्या कापसाचे जेव्हा प्रतवारी तपासले जाते

### वजन करताना प्रति क्विंटल कापसामागे घेत आहे दोन किलो अतिरिक्त कापूस

त्यावेळी शासनाच्या नियमा प्रमाणे ३४.२ लिंट चा कापूस खरेदी करावा असे शासनाच्या गाईडलाईन मध्ये असताना त्या ठिकाणी सीसीआयचे नियुक्त ग्रेडर अधिकारी हे ३६ लिंट च्या कापसाच्या प्रतवारी ची मागणी शेतकऱ्यांना करत आहे. व ३६ लिंट चा कापूस त्या ठिकाणी नसेल तर तो कापूस सीसीआय केंद्रावरून परत पाठवत आहे,सोबतच प्रतिक्विंटल कापसाच्या वजनामागे दोन किलो अतिरिक्त कापूस घेऊन सीसिया केंद्रावर एक प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप शेतकऱ्यां नी केला आहे.

## ऑनलाईन डाटा खरेदीचे आमिष युवकाचे तब्बल ३.११ लाख हडपले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अचलपूर–** अज्ञात ऑनलाईन ठगबाजाने खाजगी नोकरी करणाऱ्या एका युवकाला ऑनलाईन डाटा खरेदी करण्याचे वर्क फार्म होमचे आमिष देऊन त्याची तब्बल ३ लाख ११ हजार १०५ रूपयांची फसवणूक केली. याबाबत परतवाडा पोलिसांनी युवकाच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

हर्षा धन्नु पंधरे (२७) गणेश नगर, मुगलाई पुरा, परतवाडा असे फसवणूक झालेल्या युवकाचे नाव आहे. माहितीनुसार, हर्षा पंधरे २४ ऑक्टोंबर २०२४ रोजी आपला मोबाईल हाताळत असताना अज्ञात ऑनलाईन भामट्याने त्यांना फोन केला. घरबसल्या

ऑनलाईन डेटा खरेदी करण्याचे काम करून भरमसाठ नफा मिळवा, असे आमिष भामट्याने दिले. हर्षा पंधरे यांनी काम करण्याची तयारी दाखविताच भामट्यांनी दोन दिवसात त्यांना रजिट्रेशन व प्रोसेसिंग फीच्या नावाखाली त्यांच्याकडून ३ लाख ११ हजार १०५ रूपये उकळले. हर्षा पंधरे यांनी भामट्यांनी दिलेल्या अकाऊंट नंबरवर पैसे पाठविताच भामटे ऑफलाईन झाले. त्यानंतर हर्षा पंधरे यांनी बरेच दिवस या ना त्या पध्दतीने पैसे काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्याने अखेर त्यांनी याबाबत परतवाडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हे दाखलकेले

# उद्यापासून होणार बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी बाबा यात्रेचा प्रारंभ

## १९ मार्च रोजी पिंपळगाव सराई येथून निघणार संदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ परतवाडा**

महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण देशामधे प्रसिद्ध सैलानी बाबा तीर्थस्थळाच्या यात्रेला येणाऱ्या ८ मार्चपासून सुरुवात होणार आहे , होळीनिमित्त सैलानी बाबा यात्रेची दरवर्षी सुरुवात होते ११८ व्या उर्फ (यात्रा) महोत्सवाचा यावर्षी येणाऱ्या ८ मार्चपासून प्रारंभ होणार आहे , १३ मार्च रोजी दुपारी ३ वाजता होळी समारंभ होणार आहे , प्रसिद्ध संदल यात्रेची सुरुवात १९ मार्च रोजी संध्याकाळी पिंपळगाव सराई येथून होणार आहे , उर्स शरीफ २० मार्चपासून तर २२ मार्चपर्यंत मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे , फातेहा ख्वानी व महाप्रसादाचा कार्यक्रम २३ मार्चला होणार आहे संपूर्ण देशातून असंख्य भाविक भक्तांची गर्दी सैलानी बाबा यात्रेनिमित्त पिंपळगाव सराई येथे जमते प्रशासनाने या यात्रेनिमित्त विशेष पोलीस बंदोबस्त तैनात



केला आहे बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण पोलीस अधीक्षक विश्वपानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली ३५ पोलीस अधिकारी ,३१० पोलीस कर्मचारी , ६० वाहतूक पोलीस कर्मचारी , २०० होमगार्ड कार्यरत राहणार आहे , यावर्षी समाज कंटकांवरती विशेष लक्ष ठेवण्याकरिता व चोरी , दागिने लंपास , खिसे कापण्या सारख्या घटनेला टाळण्यासाठी महिला व पुरुष पोलीस कर्मचाऱ्यांची दहा पथक पहिल्यांदा नेमण्यात आली आहे सिव्हिल ड्रेस वरती या पथकातील कर्मचारी प्रत्येक व्यक्तीवर विशेष नजर ठेवणार आहे , संपूर्ण यात्रेवर टावरद्वारे पोलीस कर्मचाऱ्यांचे लक्ष राहणार आहे बुलढाणा व चिखली मार्गावरून येणाऱ्या भाविक भक्तांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था हनुमान टेकडीवर करण्यात आली आहे त्यासोबतच हनुमान टेकडी जवळील खाजगी शेतात सुद्धा पार्किंगची व्यवस्था यावर्षी करण्यात आली आहे , बुलढाण्यावरून येणाऱ्या वाहनांना साखळी , केसरपूर , माळवंदी, दुधा मार्गावर फिरवण्यात आली आहे दुधा मार्गावर दोन जागी पार्किंगची व्यवस्था शासनाकडून करण्यात आली आहे , यात्रेदरम्यान होणाऱ्या पाणीटंचाई करिता यावर्षी सैलानी बाबा ट्रस्ट कमिटी व पिंपळगाव सराई ग्रामपंचायतीच्या वतीने १० टँकरची व्यवस्था करण्यात येणार आहे , अप्पर पोलीस अधीक्षक श्री महामुनी , डीवायएसपी सुधीर पाटील व इतर वरिष्ठ पुलिस अधिकारी यात्रेदरम्यान विशेष खबरदारी घेणार आहे

होळी मध्ये नारळ टाकावे कपडे टाकू नयेसैलानी बाबा तीर्थस्थळावर होळी समारंभाची सुरुवात १३ मार्चला होणार आहे , पवित्र अशा होळी मध्ये भाविक भक्तांनी नारळ टाकावे अंगावरचे कापड टाकू नये असे आव्हान पोलीस प्रशासनाने केले आहे होळी ही नारळाची असते अंगावरचे कापड टाकण्याची नव्हे अंगावरचे कापड टाकून पवित्र होळीला अशुद्ध करू नये व ह्या होळीमध्ये इतर सामग्री सुद्धा टाकू नये

### भाविक भक्तांनी यात्रेमध्ये मूल्यवान वस्तू आणू नये

सैलानी बाबा यात्रेकरिता संपूर्ण देशातून लाखो भक्तांची गर्दी पिंपळगाव सराई येथे एकत्रित होते , या यात्रेमध्ये समाज कंटकांच्या उपस्थितीला नाकारता येत नाही भाविक भक्तांनी यात्रेमध्ये येताना आपले मूल्यवान वस्तू सोबत आणू नये आपल्या पैशाला जपून ठेवावे , लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे दागिने चोरी , खिसे कापण्यासारखी घटना घडल्यास त्वरित जवळील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा असे आव्हान रायपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दुर्गेश राजपूत यांनी केले आहे.

# जयस्तंभ चौकात ऑटोत ओढून महिलेचे अपहरण

## बडनेरा मार्गाने भरधाव पळविला ऑटो

### महिलेने आरडाओरड केल्याने दुचाकीस्वारांनी वाचविले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** – अज्ञात ऑटोचालकाने, ऑटोवून खाली उतरलेल्या महिलेसोबत भाडयाच्या पैशावरून वाद घातला आणि ऑटोमध्ये मागे बसलेल्या एका आरोपींनी महिलेला पुन्हा ऑटो ओढून तिचे अपहरण केले. चालकाने ऑटो बडनेराच्या दिशेनेभरधाव पळविला. महिलेने आरडओरड केल्यानंतर एका दुचाकीवर असलेल्या दोन युवकांनी ऑटो थांबवून महिलेला बाहेर काढल्यानंतर ऑटोचालकासह तिन्ही आरोपी तेथून फरार झाले. याबाबत कोतवाली पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

माहितीनुसार, तक्रारकर्ती महिला ही कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असून ती जयस्तंभ चौकातील एकामोठा कपडण्याच्या शोरूममध्ये काम करते. ती दररोज ऑटोने कामावर येणे–जाणे करते. नेहमीप्रमाणे महिला ५ फेब्रुवारी रोजी इर्विन चौकातून जयस्तंभचौकात जाण्यासाठी ऑटोमध्ये बसली. त्यावेळी ऑटोमध्ये ऑटोचालकाच्या ओळखीचा एक व्यक्ती बसला असून ते दोघे गप्पा करित होते. महिला दररोज ऑटोचे १० रूपये भाडे देते. त्यानुसार जयस्तंभ आल्यानंतर महिलेने ऑटोतून उतरून चालकाला १०



रूपयाची नोट दिली. परंतु, ऑटोचालकाने ती नोट महिलेच्या अंगावर फेकून तिला २० रूपये दे असे म्हटले. महिला नोट उचलण्यासाठी खाली वाकली असता मागे बसलेल्या आरोपीने महिलेने ऑटोत ओढले आणि चालकाने ऑटो भरधाव गतीनेबडनेराच्या दिशेने पळविला. साईनगर चौक क्रॉस झाल्यानंतर ऑटोमधील महिला आरडाओरड करित असल्याचे पाहताच एका दुचाकीवर असलेल्या दोन युवकांनी ऑटोचा पाठलाग करून वॉलमार्ट समोर ऑटोसमोर दुचाकी आडवी करून ऑटो थांबविला आणि महिलेला बाहेर काढले. त्यामुळे ऑटोचालक तेथून फरार झाला

# येवदा येथील सरपंच अमानु खा यांची दर्यापूर पंचायत समितीवर धडक

## घेतला विविध समस्यांचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७दर्यापूर –**

दर्यापूर तालुक्यातील ग्रा .प. येवदा येथील विविध समस्या तसेच घरकुल योजना बाबत लाभार्थांना भेडसावणाऱ्या अडचणी, समस्यांचा निपटारा करण्याकरिता येवदा येथील सरपंच अमानु खा पठान यांनी थेट पंचायत समिती कार्यालयात जावून दर्यापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कैलास तापी यांची भेट घेऊन येवदा गावातील गावकर्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, घरकुल योजना लाभार्थाना अडचणी तसेच



गावपातळीवरील लोकसंख्या जास्त असल्याने अतिरिक्त रोजगार सेवक मिळण्याबाबत व येवदा येथील विकास कामाकरिता तातडीने निधी उपलब्ध करण्यात यावा बाबत सुद्धा चर्चा केली.

गटविकास अधिकारी यांनी सदर समस्यांचा निपटारा लवकरच करण्यात येईल असे मान्य केले.

गटविकास अधिकारी यांच्या दालनात चर्चा करतांना पंचायत समिती विभागाचे सबंधित अधिकारी तसेच ग्रामपंचायत सदस्य सुयोग टोबरे, ग्रामपंचायत अधिकारी अरुण रायबोले, उबाटा गटाचे प्रदीप वडतकर सह अन्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# होळीसाठी स्थानांतरित मजुरांची मेळघाटात घरवापसी

## धारणी व चिखलदरा तालुक्यात उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मेळघाट** – गेलेल्या आदिवासींना होळी आली की, मेळघाटचे वेध लागते. मजुरांचे मेळघाटात वापसी सुरू झाल्याचे पाहावयास मिळत आहे.शहरी भागात ज्या प्रमाणे दिवाळी साजरी करण्याचे पारंपारिक महत्त्व आहे तसेच महत्त्व मेळघाटात होळीला आहे. हजारो वर्षांपासून मेळघाटच्या धारणी व चिखलदरा तथा मध्य प्रदेशातील खकणार आणि दामजीपुरा भागात होळीची घामधूम असते. वर्षभरात कष्ट व काम केल्यावर हाती आलेल्यापैशाचा पुरेपुर उपयोग म्हणजे नवीन कपडे, चांदीची आगळी-वेगळी आभुषणे, घरात आवश्यक भांडीकुंडी, इलेक्ट्रॉनिक उपकरणे खरेदी करण्यात येतात. एकूणच होळीचे सात दिवस मौजमस्ती व आरामाचे असतात. वर्षभराचा थकवासुद्धा गावातच घरातच राहून काढण्यात येतो.

(बॉक्स)सात दिवसांचा होळी महोत्सव

मेळघाटातील तीनशे गावात तिथीनुसार होळी नसते तर गावपंचायतने (चावडी) ठरवून दिलेल्या दिवशी होळी करण्यात येते. गावाला लागणारा आठवडीबाजाराचा दिवस साजरा केल्यानंतरचा



होळीसाठी दिवस निश्चित करण्यात येत असतो. होळीपासून पाच दिवस म्हणजे पंचमीपर्यंत जल्लोष असतो. धारणी भागातील कारा, खार्या, साद्राबाडी, कोट, दाबिदा या गावांमध्ये मेगनादच्या नावाने विविध पुरातन परंपरांचे जतन करण्यात येत असते. कारा आणि खार्या येथे विविध कार्यक्रम पार पडतात.

# १६ एकर परिसरात अमरावतीत साकारणार आयटी पार्क- डॉ. अनिल बोंडे यांचे प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** अमरावतीकर तरुणांच्या स्वप्नांना बळ देऊन माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात विकासाची नवी उंची गाठण्यासाठी अमरावतीत आयटी पार्क निर्माणाच्या हालचाली गतीने सुरू झाल्या आहेत. १६ एकर परिसरात प्रस्तावित आयटी पार्कचे निर्मिती होणार आहे. काही जागांची चाचणी सुद्धा करण्यात आली आहे. त्यासाठी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी उद्योग मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत या संदर्भातील संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया, जमीन अधिग्रहण पूर्ण करण्याचे निर्देश महसूल विभागाला दिले आहेत.



राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीला उद्योग मंत्रालयाचे उपसंचालक शिरसाट, उद्योग विभागाचे महाव्यवस्थापक निलेश निकम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय अधिकारी नंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, औद्योगिक वसाहत असोसिएशनचे माजी अध्यक्ष किरण पातुरकर यांच्यासह अन्य अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात नवी उंची गाठायची असेल तर अमरावतीत आयटी पार्क निर्माण होणे आवश्यक आहे. करिअरसाठीपुणे, मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या विदर्भातल्या तरुणाईला स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी खा. डॉ. अनिल बोंडेयांनी पुढाकार घेतला आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी उमेदवारांना अवधी वाढवून द्या !

## युवाहित मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी संघटनेचे जिल्हा कचेरीसमोर धरणे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षणार्थी अंतर्गत जिल्ह्यातील सात हजार गरजू बेरोजगार कार्यरत आहेत. त्या उमेदवारांना अवधी वाढवून देण्यात यावा, ही मागणी घेऊन युवाहित मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी संघटनेच्या नेतृत्वात जिल्हाकचेरी समोर गुरुवारी (ता. सहा) धरणे आंदोलन करण्यात आले. गरजू बेरोजगार प्रशिक्षणार्थी शासनाच्या विविध विभागांमध्ये



प्रशिक्षण घेत असल्याने त्यांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत आहे. त्यामुळे खर्चाचा ताण सहन करावा लागतो तसेच प्रशिक्षणार्थीना ज्या विभागात रुजू करण्यात आले त्याच शासकीय विभागांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीना कालावधी वाढवून देण्यात यावा, ही मागणी घेऊन युवा हित मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी संघटनेच्या नेतृत्वातजिल्हाकचेरी समोर एकदिवशीयधरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश साबळे, आकाश गडपाल, मधुसूदन परिसे, ओम चित्रकार, अक्षय सरोदे, आकाश गडपाल, कार्तिक टवलारे, विद्या सीनकर, संकेत नंदापुरे, योगेश गोळेकर, संतोष ठाकूर, निलेश अंभोरे, प्राजक्ता धर्माळे, स्वाती धर्माळे, सीमा निकोसे, हर्षल भेंडे, राहुल घुमरड, शिवम पंदे यांच्यासह जिल्हाभरातील प्रशिक्षणार्थी आंदोलनात सहभागी झाले होते.

# स्मार्ट प्रीपेड इलेक्टिक मीटर अमान्य, १० मार्चला वीज ग्राहक जनमोर्चा

## स्मार्ट/प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर विरोधी कृती समिती आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती –**

वीजग्राहकांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात अमरावती जिल्ह्यातील जनता एकवटली असून स्मार्ट प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर विरोधी कृती समिती निर्माण झाली आहे. या समितीच्या वतीने सोमवार १० मार्चला दु. १२ वा. विजग्राहक जनमोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक (इरविन चौक) अमरावती येथून निघून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंतांच्या कार्यालया वर धडक देणार आहे. यावेळी स्मार्ट /प्रीपेड मीटर अमान्य असल्याचे हजारो अर्ज दाखल करण्यात येणार आहे.विज ही मूलभूत गरज आहे हे दैनंदिन व्यवहाराने सिद्ध झाले आहे. त्यामध्ये होणाऱ्या बदलाचा थेट परिणाम दैनंदिन जीवनावर होतो. जनसंख्येमध्ये ८५% जन विभाग शेतकरी, शेतमजूर, कुशल अकुशल कामगार, असंघटित कामगार, जेमतेम जीवन जगणारा आहे. म्हणून याबाबतीत वीज ग्राहकांना खाजगी कंपन्यांच्या दावणीला बांधणे, त्याला नफ्याचे क्षेत्र बनविणे सरकारने आपली जबाबदारी नाकारणे हे समग्र भारतीय लोकशाही संकल्पनेच्या विरोधात आहे. सदर वीज जनमोर्चा मध्ये संयुक्त किसान मोर्चा, संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समिती, किसान आजादी आंदोलन




महाराष्ट्र राज्य किसान सभा अखिल भारतीय किसान सभा, राज्य सरकारी कर्मचारी संघटनाआयटक कामगार संघटना सीटू कामगार संघटना, भारतीय खेत मजदूर यूनियन, महाराष्ट्र राज्य शेतमजुर युनियन लालबावटा, आम आदमी पक्ष किसान आघाडी आझाद समाज पार्टी, नवजागरण मनिशी व क्रांतिकारी स्मरण समिती, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड किसान पुत्र आंदोलन, स्वाभिमानी शेतकरी संघटना, संत्रा बागायतदार संघटना, अंगणवाडी कर्मचारी संघटना आयटक अंगणवाडी कर्मचारी संघटना सिटु, भारतीय महिला फेडरेशन, जनवादी महिला संघटना, ऑल इंडिया युथ फेडरेशन, डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया अखिल भारतीय दलित अधिकार आंदोलन आदी संघटनांचा सहभाग आहे. आंदोलनामध्ये सहभागी होण्याचे आवाहन कॉ. तुकाराम भस्मे, अशोक सोनारकर, चंद्रकांत बानुबाकोडे, डी एस पवार, सुभाष पांडे , प्रा. साहेबराव विदळे, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे , सतीश चौधरी, सुनील मेटकर, महादेव गारपवार,देविदास राऊतराऊत, शयाम शिदे, एच डी घोम, जे एम कोठारी, महेश जाधव, निळकंठ ढोके, रमेश सोनुले ,सुनीलभाऊ देशमुख, संजय मांडवदरे, सुनील घटाळे, दिली पशापा मोहन, नितीनगवळी, डॉ. अलीम पटेल, किरण गुडधे, गणेश मुंदरे, अश्विन चौधरी, डॉ प्रफुल्लगुडदे, मनीष पाटील प्रकाश दादा साबळे, चेतन परडके धनंजय तोटे, मीरा कैथवास, पद्माताई गजभिये, प्रफुल्ल देशमुख, वंदना बुरांडे, चित्राताई वंजारी, आशाताई वैद्य, सागर दुर्योधन, कैलास चव्हाण, किशोर शिदे, दीपकराव विदळे, उमेश बनसोड, प्रा.प्रसेनजीत तेलंग, ज्ञानेश्वर मेश्राम आदींनी केले आहे.

# महिमापूरच्या ऐतिहासिक पायविहिरीचा होणार 'मेकओव्हर' पोस्ट कार्डवर झळकली होती विहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७दर्यापूर**

स्थापत्यकलेचा अप्रतिम नमुना असलेली, ऐतिहासिक पायविहीर दर्यापूर तालुक्यातील महिमापूर या छोट्याशा गावात १४ व्या शतकापासून आजही दिमाखात उभी आहे. या सुंदर पायविहिरीचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने ऑगस्ट २०२३ मध्ये २ कोटी ८८ लाख ८१ हजार ५१० रुपये निधी मंजूर केला होता. त्यापैकी ९३.२७ लाख रुपयांचा निधी २७ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आला आहे. या निधीतून त्या ऐतिहासिक पायविहिरीचा मेकओव्हर होणार आहे.



महिमापूरस्थित पायऱ्यांची विहीर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाच्या २ कोटी ८८ लाख ८१ हजार ५१० रुपये इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सन २०२३ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. ते काम तुमसर येथील एका कंत्राटदाराने २.६७ कोटी रुपयांमध्ये घेतले आहे. त्या कामास सुरुवात झाली असून, २७ फेब्रुवारी रोजी एकूण खर्चापैकी ९३.२७ लाख रुपयांच्या प्रथम देयकासदेखील मान्यता देण्यात आली आहे. या ऐतिहासिक राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्तीची कामे ही विशिष्ट प्रकारची असून, ती कामे पुरातत्त्वशास्त्र संकेतानुसार करणे आवश्यक आहे.

**पोस्ट कार्डवर झळकली होती विहीर**

राष्ट्रीय टपाल दिनाचे औचित्य साधून केंद्रीय टपाल विभागाने ऑक्टोबर २०२३ मध्ये या विहिरीचे छायाचित्र पोस्ट कार्डवर झळकल्याने ही पायविहीर राष्ट्रीय नकाशावर आली आहे. तथापि, जिल्ह्याचे वैभव असलेली ही विहीर दुर्लक्षितच होती. पुरातत्त्व विभागाच्या लेखी राज्य संरक्षित स्मारक म्हणून या विहिरीची नोंद असली तरी विहिरीच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष करण्यात आले होते; मात्र आता सुमारे २.८८ कोटींमधून विहिरीचे जतन केले जाणार आहे.

**अमरावती जिल्ह्याच्या 'गॅझेटियर'मध्ये नोंद**

विहिरीचे आतील बांधकाम संपल्यावर तळाशी चहुबाजूंनी ओटच्यासमान रचना, आतमध्ये दोन कोरीव ध्यानस्थ मूर्ती, अशी या विहिरीची रचना आहे. ही विहीर मुघलकालीन असल्याचा उल्लेख अमरावती जिल्ह्याच्या 'गॅझेटियर'मध्ये आहे. जमिनीपासून तीन-चार फूट उंचीपासून विहिरीच्या तळापर्यंतचे बांधकाम आजघडीला बघता येत असले तरी त्याशिवाय कालौघात नष्ट झालेली इतर अनेक वैशिष्ट्ये या विहिरीत होती.

# सावंगा विठोबा येथे दररोज जाळतात १० किलो कापूर

## गुढी पाडव्याला जळतो १२ क्विंटल कापूर, १६०० लोकवस्तीच्या गावाला मिळाला रोजगार

**विदर्भ राजासत्ताक**
**दि.७चांदुर बाजार**

चांदूर रेल्वे तालुक्यातील १६०० लोकवस्ती असलेल्या सावंगा विठोबा गावाला कापुराचे गाव अशी ओळख मिळाली आहे. कारण, येथे दररोज किमान १० किलो कापूर जाळला जातो. त्याचप्रमाणे गुढी पाडव्याला येथील श्रीकृष्ण अवधूत महाराज संस्थानात मोठी यात्रा भरते. या वेळी किमान १२ क्विंटल कापूर उजळला जातो. ही परंपरा ३५० वर्षांपासून सुरू आहे. या परंपरेने येथील बऱ्याच गावकऱ्यांना रोजगार दिला आहे.




गुढी पाडव्याला श्रीकृष्ण अवधूत महाराज संस्थान सावंगा विठोबा येथे भरणारी यात्रा विशेष असते. या कालावधीत मंदिरात समांतर असलेल्या दोन लाकडी ध्वज खांबांना त्यावर पाय न ठेवता खोळ चढवली जाते. तसेच एकाच दिवशी १२ क्विंटल कापूर जाळला जातो. जिल्ह्यासह राज्य व देशभरातून गुढी पाडव्याला किमान ४ लाख भाविक दर्शनाला येत असतात, अशी माहिती संस्थानद्वारे देण्यात आली.

३५० वर्षांआधी कृष्णाजी महाराज यांनी कापूर जाळण्याची परंपरा सुरू केली, ती पुनाजी महाराज यांनीही पुढे सुरू ठेवली. त्यामुळे ती अजूनही अव्याहतपणे सुरू असून यात गावातील भाविकांसह देशभरातील भाविकांचे योगदान असते. आठवड्यातील बुधवार व रविवारी येथे मोठ्या प्रमाणात कापूर जाळला जातो. एवढेच नव्हे तर दर अमावस्येला चंदन उटी सोहळ्यातही भाविकांकडून कापूर प्रज्वलित केला जात असतो. त्यामुळे सावंगा विठोबा गावाला कापुराचे गाव अशी ओळख मिळाली आहे. येथे दरवर्षी नियमितपणे शेकडो क्विंटल कापूर जाळला जात असल्यामुळे हा कापूरच आता येथील गावकऱ्यांच्या उत्पन्नाचे साधन बनले आहे. अनेक भाविक स्वत:सोबत कापूर आणत नाही. तर येथेच तो किलोने खरेदी करतात. कापुराचे गाव, जेव्हापासून या गावातील मंदिरात कापूर जाळला जातो. तेव्हापासून येथे कापुराची विक्री केली जाते. त्यामुळे गावात प्रवेश करताच कापुराचा सुगंध नाकात शिरतो. या कापुराच्या सुगंधामुळे गावातील वातावरणही शुद्ध राहते. त्यामुळेच या गावाला कापुराचे गाव असे नाव मिळाले आहे.

# वाळूची अवैध वाहतूक करणारी ट्रॅक्टर ट्रॉली महसूलकडून जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७दर्यापूर**

तालुक्यात अवैधरीत्या वाळू, मुरूम व गौण खनिजांची तस्करी राजरोसपणे सुरू आहे. अशात बुधवारी रात्री तहसीलदार डॉ. रवींद्रकुमार कानडजे यांच्या पथकाने एक ब्रास वाळूसह ट्रॅक्टर ट्रॉली जप्त केली.



दर्यापूर शहरासह ग्रामीण भागातील ठिकठिकाणच्या नदीपात्रातून अवैध गौण खनिजांची मोठ्या प्रमाणावर चोरटी वाहतूक होत आहे. दरम्यान बुधवारी रात्री महसूलचे पथक आसेगाव-अमरावती टी पॉइंटजवळ गस्तीवर असताना रात्री साडेबार वाजता माहुली (धांडे) नदीपात्रातून वाळूचे अवैध उत्खनन करून एक ब्रास वाळू ट्रॉलीत घेऊन ट्रॅक्टर दर्यापूर शहरात येत होते. त्याच वेळी महसूल पथकाने विनाक्रमांकाची ट्रॅक्टर ट्रॉली थांबवून चालकाकडे चौकशी केली असता, वाहन परवाना आदी नसल्याचे समोर आले. पंचनामा व पुढील कारवाई करत ट्रॅक्टर ट्रॉली दर्यापूर पोलिस ठाण्यात जमा केली. ही कारवाई नायब तहसीलदार अमरसिंह पवार, मंडळ अधिकारी आर. एन. जावरकर, तलाठी प्रदीप गित्ते व चालक चक्रधर बेलसरे यांनी केली आहे.

### थेट कारवाई सुरूच राहील

गौण खनिजांची चोरट्या मार्गाने वाहतूक करणाऱ्याची आता गया केली जाणार नाही. कारवाईसाठी तहसील स्तरावर वेगवेगळी पथके तयार करण्यात आली आहेत. महसूल पथकांकडून ठिकठिकाणी यापुढे थेट कारवाई सुरूच राहील.

**-डॉ. रवींद्रकुमार कानडजे, तहसीलदार, दर्यापूर**

# ६६ हजार नागरिकांची सुकन्या योजनेला पसंती

## मुलीचा विवाह, उच्च शिक्षणाची चिंता मिटली, ११ मार्चपर्यंत विशेष अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती मुलींचे सक्षमीकरण हा हेतू पुढे ठेवून त्यांचा विवाह आणि उच्च शिक्षण या दोन्ही महत्वपूर्ण बाबींची चिंता मिटवण्यासाठी जिल्ह्यातील ६६ हजार नागरिकांनी पुढाकार घेतला आहे. उच्च शिक्षण आणि विवाह या दोन्ही बाबी संरक्षित करणाऱ्या टपाल खात्याच्या सुकन्या योजनेला त्यामुळेच नागरिकांनी प्रथम पसंती दर्शवली आहे. दरम्यान जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर या योजनेसाठी ११ मार्चपर्यंत विशेष अभियानही राबवले जात आहे. सुकन्या समृद्धी योजना ही शून्य ते १० वर्षे वयाच्या मुलींसाठी आहे. प्रारंभी अडीचशे आणि त्यानंतर शंभर रुपयांच्या पटीत दरवर्षी जास्तीत जास्त दीड लाख रुपये



भरण्याची या योजनेत सोय आहे. विशेष म्हणजे मुलगी १८ वर्षाची झाली की तिच्या उच्च शिक्षणासाठी ५० टक्के रक्कम काढण्याची हमी देण्यात आली आहे. त्यामुळे वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी वा इतर खर्चिक अभ्यासक्रमाचा ताण ओढवत नाही. जमा असलेली रोख आणि त्यावरील व्याज मिळून जी रक्कम तयार होईल, त्यातील निम्मी रक्कम यासाठी काढता येते, असे सुकन्या योजनेत नमूद आहे. त्यामुळे बहुतेक नागरिकांनी आपापल्या कुटुंबातील मुलींच्या नावे सुकन्या योजनेचे खाते उघडले आहे. काहींनी तर भेट द्यावी म्हणूनही या खात्याचा उपयोग केल्याचे टपाल खात्याचे डेप्युटी पोस्ट मास्टर यांचे म्हणणे आहे. मुलीच्या विवाहाचा खर्च भागवण्यासाठी हे खाते पूर्णत: बंद करता येते. त्यावेळी खात्यातील संपूर्ण रक्कम सव्याज परत दिली जाते. परंतु तत्पूर्वी खाते उघडल्यापासून सलग १५ वर्षे या खात्यात रक्कम जमा करावी लागते. खाते मध्येच बंद करण्याची सोय नसल्याने गृहिणींनी विशेषकरून या योजनेकडे लक्ष केंद्रीत केल्याचेही या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान ११ मार्चपर्यंत या योजनेसाठी विशेष अभियान राबवण्यात येत असल्याने टपाल खात्याच्या सर्वच कार्यालयांमध्ये त्यासाठीची लगबग सुरू आहे. टपाल खात्याच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने राबवण्यात येणाऱ्या विशेष अभियानाचाल नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### केंद्राच्या फ्लॅगशिप योजनेत समावेश

टपाल विभागाने ही योजना केंद्र सरकारच्या फ्लॅगशिप कार्यक्रमात समाविष्ट केली आहे. त्यामुळे पोस्टाचे बचत खाते, आवर्ती ठेव (आरडी), डाक जीवन विमा, दरमहा व्याज योजना, ज्येष्ठ नागरिक बचत योजना आदींमध्ये या योजनेवर जास्त लक्ष केंद्रीत केले आहे. शिवाय या योजनेत सर्वात जास्त व्याज दिले जात असल्याने नागरिकांनीही तिला अधिक पसंत केले आहे.

**– एस. के. अत्रेय, डेप्युटी पोस्ट मास्टर, अमरावती.**



# शेताचा धुरा पेटवल्याने परिसरातील नागरिकांची उडाली तारांबळ

## वाठोडा शुक्लेश्वर खोलापूर मार्गावरची घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७भातकुली**

भातकुली तालुक्यातील वाठोडा शुक्लेश्वर -खोलापूर मार्ग लागत असलेल्या गावाजवळील शेतामधील शेताचा धुरा पेटवल्याची घटना ७ मार्च रोजी दुपारी १२वाजता सुमारास उघडकीस आली आहे,

अज्ञात व्यक्तीने हा शेताचा धुरा पेटवल्याचा अंदाज वर्तवल्या जात आहे.परिसरातील नागरिकांचे वास्तव्यात असणारे घरे , गुराढोरांचे गोठे, गुरांचे चारे या ठिकाणी असल्याने अज्ञात व्यक्तीकडून शेताचा धुरा पेटवल्याने मोठी हानी निर्माण होऊ शकते सर्व परिस्थिती लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी ग्रामविकास अधिकारी विकास वैद्य यांना दूरध्वनीवरून माहिती देण्यात आली त्यांनी तात्काळ ग्रामपंचायत येथील कर्मचारी घटनास्थळी पाठवले आगीवर नियंत्रण आणण्यास ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना यश आले.

# कीर्तनाचा प्रसार होण्यासाठी आधुनिक सामाजिक माध्यमांचा वापर होणे आवश्यक : ह भ प केशव महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७ धामणगांव रेल्वे**

संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सव धामणगाव रेल्वेआजच्या आधुनिक काळातही कीर्तनाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन प्रभावीपणे होत असून कीर्तनाचा प्रसार नवीन पिढीपर्यंत होण्यासाठी आधुनिक सामाजिक माध्यमांचाही वापर होणे आवश्यक आहे, असे मत झाडगाव चीचोली येथील ह भ प केशव महाराज यांनी व्यक्त केले

जळगाव आर्वी येथे सुरू असलेल्या संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ह भ प केशव महाराज यांनी संत आणि कीर्तन यामधील दुवा मांडला संतांनी कीर्तनातून तत्कालीन समाजाला प्रापंचिक ज्ञान, नैतिक व्यवहार आदींचे शिक्षण दिले. समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडली. संत ज्ञानदेवांपासून संत कबिरापर्यंत सर्वांनी कीर्तनाच्या माध्यमातून केवळ धर्मप्रसारच नव्हे, तर संस्कृतीचे रक्षणही केले आहेचारित्र्यवान, कृतीशील आणि सामर्थ्यवान समाजाच्या निर्मितीसाठी नवीन पिढीतील कीर्तनकारांनी पुढाकार घेतला पाहिजे. समाजात परिवर्तन घडवून




आणणारी कीर्तन ही एक प्रभावी चळवळ असल्याचे ह भ प केशव महाराज म्हणालेया संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवात ह भ प विलास कोरडे महाराज, ह भ प अनील महाराज साखरे,ह भ प स्वाधी सर्वेश्वरी दीदी , ह भ प विशाल महाराज बढे यांचे दररोज रात्री कीर्तन राहणार आहे सकाळी ग्रामसफाई गावकरी भजन मंडळाच्या वतीने काकडा हरिपाठ व सामुदायिक प्रार्थना राहणार आहे मंगळवारी ११ मार्च रोजी होम पूजा तर काल्याचे कीर्तन वासुदेव महाराज सुपलकर यांचे राहणार आहे यावेळी आमदार प्रताप अडसड, गोपाल भूत अर्चना वानखडे यांची उपस्थिती राहणार आहे याच दिवशी सायंकाळी दिंडी महोत्सव आयोजीत केला असून यात विदर्भातील नामवंत दिंड्या सहभागी होणार आहे या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संत लहरी बाबा संस्थान व ग्रामस्थांनी केले आहे.

# पावर लिफ्टिंग स्पर्धाचे दर्यापुरात प्रथमच आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७दर्यापूर**

दर्यापूर तालुक्यातीत प्रथमच योद्धा जिमने पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचे दि ९/३/२०२५ रोज रविवारला आयोजन सर्वज्ञ कॉम्प्लेक्स मध्ये करण्यात आले स्पर्धेमध्ये वजन गट नुसार स्पर्धा घेण्यात येणार असून त्यामध्ये पुरुष वजन गट ५० ते ६० व दुसरा गट६१ते ६५ तिसरा गट६६ते ७० चौथा गट७१ते ७५ असे गट मध्ये स्पर्धा असून बेचप्रेस, डेड लिफ्ट व पुशअप हे इव्हेंट्स असून पहिल्या चार मध्ये येणाऱ्या स्पर्धकाला प्रथम बक्षीस मास गेनर (४७९९ रू ) द्वितीय बक्षीस एक केजी वे प्रोटीन( २४९९ रू ) तिसरा प्राजितोषिक ३.७



ग्रॅम क्रिटिंग (१४९९ रू ) चतुर्थ बक्षीस एक केजी एनर्जी ड्रिंक (१०९९रू ) त्याचबरोबर सर्टिफिकेट व मेडल्स देणार आहे दर्यापुरातून जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे योद्धा जिमचे संचालक वैभव दीपक मालखेडे यांनी केले.

# न्या. भूषण गवई होणार सरन्यायाधीश

## १४ मे रोजी राष्ट्रपती भवनात शपथविधी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांचा देशाच्या सरन्यायाधीशपदाचा कार्यकाळ १३ मेपासून सुरू होणार आहे. त्यांना १४ मे रोजी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ देण्यात येणार आहे. न्यायमूर्ती भूषण गवई देशाचे सरन्यायाधीश होत असल्याने अमरावती जिल्ह्यात आतापासूनच आनंदी आनंद दिसून येत आहे. शपथविधीनंतर लगेचच अमरावतीत भव्य नागरी स्वागत होणार आहे.

अमरावती शहरासह जिल्ह्यासाठी हा अत्यंत अभिमानाचा आणि सन्मानाचा क्षण असेल. त्यामुळे अमरावतीकरांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. अमरावतीचे सुपूत्र न्या. भूषण गवई यांचे हे यश आणि यश साजरे करण्याची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. उल्लेखनीय आहे की, आरआयपी नेते, माजी खासदार तथा माजी राज्यपाल



रा. सु. उर्फ दादासाहेब गवई व माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई यांचे ते जेष्ठ पुत्र आहेत. न्या.भूषण गवई यांचे प्राथमिक शिक्षण अमरावती येथे झाले, मुंबईतून कायद्याची पदवी घेतल्यानंतर काही काळ मुंबईत वकीली व्यवसाय केल्यानंतर न्या. भूषण गवई यांनी अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयातही विधीज्ञ म्हणून सेवा दिली. अमरावती येथील न्या. भूषण गवई यांचे अनेक जवळचे मित्र आणि कुटुंब आहेत. तसेच १९९० च्या सुमारास नागपुरात जाऊन सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड. राजा एस. भोसले यांच्यासोबत त्यांनी सराव सुरू केला.

नागपूरला आपले कार्यक्षेत्र बनवले. न्या. भूषण गवई यांनी अमरावतीतील त्यांच्या मित्रांशी सतत संपर्क ठेवला आणि अनेकवेळा ते अमरावतीला येत राहिले. उच्च न्यायालयात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती झाल्यानंतरही हा क्रम त्यांनी कायम ठेवला आहे. यामुळे न्या. भूषण गवई यांना सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्तीपद मिळणार असल्याचा आनंद अमरावतीत राहणाऱ्या सर्व मित्रमंडळींमध्ये पाहायला मिळत आहे.

अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयात न्या. भूषण गवई यांचे समकालीन ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आपल्या आठवणींना उजाळा देताना ॲड. अशोक जैन म्हणाले की, १९८५ मध्ये मुंबईतून कायद्याची पदवी मिळवल्यानंतर न्या. भूषण गवई यांनी काही काळ मुंबईत प्रॅक्टिस केली होती आणि १९८९-९० या काळात ते पुन्हा अमरावतीला आले आणि येथे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. प्रकाश उर्फ पी.एन. राठी यांच्या मार्गदर्शनाखाली सराव सुरू केला.त्यावेळी ॲड. राठी यांनी भूषण गवई यांची क्षमता पाहून त्यांना अमरावतीत वेळ घालवण्याऐवजी नागपूर उच्च न्यायालयात जाऊन सराव करण्याचा सल्ला दिला. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी निवृत्त न्यायाधीश ॲड. राजाभाऊ भोसले यांच्यासोबत उच्च न्यायालयात प्रॅक्टिस सुरू केली आणि त्यांच्या मेहनतीच्या आणि क्षमतेच्या जोरावर पुढील दोन वर्षांत त्यांनी खासगी प्रॅक्टिस सोडून उच्च न्यायालयात सरकारी वकील म्हणून काम सुरू केले. सुमारे १०-११ वर्षे सहाय्यक, अतिरिक्त आणि मुख्य सरकारी अभियोक्ता म्हणून काम केल्यानंतर न्या. भूषण गवई यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि त्यांनी२०१९ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्यायमूर्ती म्हणून काम केले. त्यानंतर २४ मे २०१९ रोजी न्या. भूषण गवई यांची देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी निवड झाली. ही अमरावती शहर व जिल्ह्यातील विधी क्षेत्रासह तमाम जनतेसाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. ॲड. अशोक जैन यांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ मे रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांचा शपथविधी सोहळा होणार आहे.

### अमरावतीला दुसऱ्यांदा सर्वोच्च पदाचा मान



याआधी काँग्रेसच्या नेत्या, माजी खासदार व माजी राज्यपाल प्रतिभाताई पाटील यांनी राष्ट्रपती पद भूषवले आहे. याशिवाय माजी महामहिम प्रतिभाताई पाटील यांनी देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा विक्रमही केला होता. परिणामी अमरावतीचे नाव संपूर्ण देशात परिचित झाले. आता अमरावतीचे सूपूत्र न्या. भूषण गवई हे सरन्यायाधीशपदाची जबाबदारी सांभाळणार आहेत. अमरावती जिल्ह्याला देशाचे सर्वोच्च पद मिळणार आहे.

**६ महिने १० दिवसांचा असेल कार्यकाल!**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ मे २०२५ रोजी देशाचे ५४ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतल्यानंतर न्या. भूषण गवई २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत या पदावर राहतील, म्हणजेच सिजेआय म्हणून त्यांचा कार्यकाळ ६ महिने १० दिवसांचा राहणार आहे.

**अमरावतीतून शेकडो वकील शपथविधीला जाणार**

न्या. भूषण गवई यांच्या थेट संपर्कात असलेले अमरावती बार असोसिएशनचे सुमारे १०० वकील दिल्ली येथील शपथविधीत सहभागी होणार आहेत. त्यासाठी पूर्वतयारी व नियोजन करण्यात आलेले आहे. न्या. भूषण गवई यांची मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्यानंतर अमरावती जिल्हा बार असोसिएशनच्या वतीनेही त्यांना अमरावती येथे निमंत्रित करून त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. यासाठीही बार असोसिएशनमध्ये आवश्यक चर्चा सुरू झाली आहे. मात्र, सध्या सर्व तयारी प्राथमिक स्वरुपात असून, ती मार्चअखेर पूर्ण होणार आहे.

# जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सुरक्षा व समानतेसाठी उद्याला वॉकथॉन




विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अमरावती जिल्हा प्रशासनात वतीने पहिल्यांदाच महिलांकरिता वॉकथॉन चे आयोजन शनिवार आठ मार्च रोजी सकाळी सहा वाजता करण्यात आले आहे.महिला सुरक्षा आणि समानता हा संदेश घेऊन जिल्हा प्रशासनाने यावर्षी वॉकथॉन चे आयोजन केले आहे. जिल्हा क्रीडा संकुल अमरावती येथून शनिवार आठ मार्च रोजी सकाळी सहा वाजता वॉकथॉनला सुरुवात होईल. जिल्हा क्रीडा संकुल ते इर्विन चौक, इर्विन चौक ते गर्ल्स हायस्कूल चौक, श्री शिवाजी शिक्षण संस्था मुख्य कार्यालय, राठी विद्यालय,श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय या परिसरातून वॉकथॉन मार्गाचे नियोजन करण्यात आले आहे. जवळपास तीन किलोमीटर वॉकथॉन झाल्यानंतर जिल्हा क्रीडा संकुल येथे सकाळी आठ वाजता समारोप होईल. या समारोप कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय (पीसीपीएनडीटी) आणि महिला बालकल्याण विभाग यांच्या विशेष पुढाकारातून जागतिक महिला दिनानिमित्त अमरावतीत होत असलेल्या वॉकथॉन मध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेण्याचे आवाहन महिला व बालविकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास मरसाळे,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौदाळे, पीसीपीएनडीटीच्या प्रमुख ड.प्रणिता भाकरे, महिला बालकल्याण विभाग मुख्य समन्वयक अधिकारी सुनील सोसे यांनी केले आहे.

# यावर्षी किती कापूस खरेदी केला, किती नाकारला ?

## उच्च न्यायालयाची कापूस महामंडळाला विचारणा, माहिती मागितली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७नागपूर

३२यावर्षी राज्यामध्ये किती कापूस खरेदी करण्यात आला व किती कापूस गुणवत्ताहीन ठरवून नाकारण्यात आला याची केंद्रनिहाय आकडेवारी आणि कापूस खरेदी नियमांची माहिती दोन आठवड्यांत सादर करा, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गुरुवारी भारतीय कापूस महामंडळाला दिला.

यासंदर्भात ग्राहक पंचायतचे जिल्हा संघटक (ग्रामीण) श्रीराम सातपुते यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. कापूस महामंडळाच्यावतीने ८ ते १२ टक्के ओलावा असलेल्या कापसाचीच खरेदी केली जाते. त्यानुसार आतापर्यंत राज्यातील १२४ केंद्रांमधून सुमारे १ कोटी ४ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे आणि शेतकऱ्यांना ९ हजार ५०० कोटी रुपयांचा



चुकाराही देण्यात आला आहे. महामंडळाने न्यायालयाला प्रतिज्ञापत्राद्वारे ही माहिती दिल्यानंतर सातपुते यांनी काही केंद्रांमध्ये शेतकऱ्यांचा कापूसच खरेदी करण्यात आला नाही, असा आरोप केला आणि संबंधित कापूस १०० टक्के गुणवत्ताहीन होता का, असा सवाल उपस्थित केला. न्यायालयाने ही बाब लक्षात घेता वरील आदेश दिला.

**केंद्रांची संख्या बदलत राहते**

१) राज्यातील शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे कापसाचे उत्पादन दरवर्षी कमी-जास्त होते. त्यामुळे बाजाराची परिस्थिती व कापसाचे उत्पादन लक्षात घेऊन किती खरेदी केंद्रे सुरू करायची हे ठरवले जाते.

२) खरेदी केंद्रांची संख्या व स्थळांमध्ये आवश्यकतेनुसार बदल करावा लागतो.

३)यावर्षी सुरुवातीला १२१ खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली होती. त्यानंतर मागणीनुसार सात खरेदी केंद्रे वाढविण्यात आली, असेही महामंडळाने न्यायालयाला सांगितले.

# अंबादेवी मंदिरासमोर नवसाची होळी; महिनाभर आधीच होळी उभारण्याची प्रथा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

होळी हा आनंदाचा आणि रंगांचा सण. फाल्गुन महिन्यात होळी दहन केलं जातं. परंतु, अमरावती शहराची ग्रामदैवत असणाऱ्या श्री अंबादेवी मंदिरासमोर महिनाभर आधीच माघ पौर्णिमेला होळी उभारली जाते. या होळीत महिनाभर नवसाचे नारळ रचले जातात आणि ओटी भरली जाते. 'नवसाची होळी' अशी ओळख असणाऱ्या या होळीची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे.



दर वर्षी माघ पौर्णिमेला अंबादेवी मंदिरासमोर होळी उभारली जाते. जळताना वातावरण प्रसन्न करणारं आणि औषधी गुण असणारा धूर वातावरणात पसरविणाऱ्या हेटीच्या झाडाचं खोड मध्यभागी उभारलं जातं. यानंतर या होळीत शास्त्रोक्त विधीद्वारे नारळ, शेणाचा गोवऱ्या रचल्या जातात. गाठी देखील वाहिली जाते. काही लाकडं या होळीत उभारली जातात. यावर्षी १२ फेब्रुवारीला ही होळी संपूर्ण धार्मिक विधीसह उभारण्यात आली आहे,

माघ पौर्णिमेपासून अंबादेवी मंदिरासमोर होळी रचण्यात आली आहे. या होळीला महिला ओटी आणि नारळ वाहण्यासाठी रोज येत आहेत. महिला आपल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी होळीला ओटी भरून नवस करतात. यासह ज्यांच्या इच्छा पूर्ण होतात त्या महिला देखील होळीची ओटी भरतात आणि नारळ अर्पण करतात. होळीच्या दिवशी घरात अनेक कामं आल्यानं महिलांना होळीच्या दिवशी येणं शक्य होत नाही. त्यामुळं महिला आधीच आपल्या नवसाची ओटी आणि नारळ वाहतात. सव्वाशे वर्षांपासून ही प्रथा सुरू असल्याची नोंद श्री अंबादेवी मंदिर संस्थेत आहे.

फाल्गुन पौर्णिमेला सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी विधीद्वारे होळी पेटवली जाते. होळीला देवी मानलं जातं. मंदिर संस्थांच्यावतीनं खणा नारळाची ओटी भरली जाते. यावेळी शेकडो भाविक होळीमध्ये नारळ अर्पण करतात. सायंकाळी संपूर्ण विधीसह होळी पेटवली जाते अशी माहिती रवींद्र कर्वे यांनी दिली.

# विमानतळाला प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराजांचे नाव ?

## मंत्रिमंडळात चर्चा : केंद्र शासन घेईल अंतिम निर्णय

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

बेलोरा विमानतळाला प्रज्ञाचक्षु गुलाबराव संत महाराज यांचे नाव देण्याची चर्चा गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. आता विधिमंडळात तसा ठराव मांडण्यात येईल. ठरावाला मंजुरी मिळाल्यानंतर केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी तो पाठविण्यात येईल. केंद्राची मंजुरी मिळाल्यानंतर अमरावती विमानतळ 'प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज अमरावती विमानतळ' या नावाने



ओळखले जाईल.ते वृत्त अमरावतीत धडकताच विमानतळाला शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुखांचे नाव कायम ठेवण्याची मागणी समोर आली आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चेत असलेले अमरावती विमानतळ आता जवळपास तयार झाले असून, पुढील महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात या विमानतळावरून पहिले विमान उड्डाण घेण्याची शक्यता आहे

नुकतीच या विमानतळावर एअर कॅलिब्रेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर अर्थात पीएपीआय चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यामुळे अमरावतीकरांना मुंबईपर्यंत विमानाने ये-जा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.अमरावती विमानतळावरून विमान उड्डाण करण्यासाठी डीजीसीएकडून परवानगी मागण्यात आली आहे. ही परवानगी आल्यानंतर इथून नियमित विमान उड्डाण सुरू होईल. हे विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर विदर्भात नागपूर आणि गोंदिया पाठोपाठ हे तिसरे व्यावसायिक वापरासाठीचे विमानतळ ठरेल.




### आधीच डॉ. पंजाबराव देशमुखांचे नाव ?

जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरू पाहणाऱ्या बेलोरा विमानतळाला अखेर राज्य शासनाने देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख असे नामकरण केल्याचे जानेवारी २०२३ मध्ये स्पष्ट झाले होते. गत पाच वर्षांपूर्वी अमरावती जिल्हा परिषदेच्या सभागृहात बेलोरा विमानतळाला डॉ. भाऊसाहेबांचे नाव देण्यासंदर्भात प्रस्ताव मंजूर करून तो शासन निर्णयार्थ पाठविण्यात आला होता.



# अमरावती मनपा आयुक्तांना वॉरंट

विदर्भ प्रजासत्ताक दि.७नागपूर

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका शिक्षिकेच्या बदली प्रकरणामध्ये अमरावती महापालिका आयुक्तांना दहा रुपयांचा जामीनपात्र अटक वॉरंट जारी करून येत्या १९ मार्च रोजी प्रकरणावरील सुनावणीला हजेरी लावण्याचे निर्देश दिले आहेत.

आलिया फरहत, असे शिक्षिकेचे नाव असून त्या जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळेत २००६ पासून कार्यरत आहेत. २९ जून २०१७ च्या शासन निर्णयानुसार, अमरावती महानगरपालिकेच्या शाळेत सामावून घेतले जावे, यासाठी त्यांनी २१ जून २०१९ रोजी अर्ज केला होता. त्यावर अद्याप निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे फरहत यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्यायमूर्तिद्वय अविनाश घरोटे व अभय मंत्री यांच्यासमक्ष सुनावणी झाली. दरम्यान, त्यांनी महापालिका आयुक्त दीर्घ काळापासून न्यायालयात हजर झाले नसल्याची बाब लक्षात घेता वॉरंट बजावला आहे.

# हमी केंद्राकडे राज्यातील शेतकऱ्यांची पाठ : २ लाख टन तूर खरेदीचे टार्गेट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.७अमरावती

खुल्या बाजारात शेतमालाचे दर घसरल्यास शेतकऱ्यांसाठी हमी केंद्रांना आधार मानले जाते. मात्र, यंदा तुरीचा हमी दर आणि खुल्या बाजारातील दर यात केवळ दोनशे रुपयांची तफावत आहे. याशिवाय नाफेडकडून खरेदी झालेल्या शेतमालाचे चुकारे उशिरा मिळत असल्याने शेतकऱ्यांनी तूर्त हमी केंद्रांकडे पाठ फिरविली आहे.

राज्यभरात १२ लाख हेक्टरवर तुरीची लागवड झाली आहे. आंतर पीक म्हणून शेतकऱ्यांनी तुरीला पहिली पसंती दिली. परंतु, तुरीचे दर पडले. यातून शेतकऱ्यांची



निराशा झाली आहे. गेल्या वर्षी क्विंटलला ११,००० रुपयांपर्यंत दर मिळत होता, तर यंदा तो साडेसात हजारांच्या घरात आला आहे. यावर्षी १२ लाख हेक्टरवर लागवडझाली आहे. यातून दहा लाख टन तूर उत्पादनाचा अंदाज मांडला गेला. प्रत्यक्षात तुरीचा उत्पादन खर्च वाढला असताना, दर पडल्याने शेतकऱ्यांमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

**२०० रुपयांची तफावत**

हमी केंद्रावर तुरीला ७ हजार ५५० रुपये क्विंटल, तर खुल्या बाजारात ७ हजार ३०० रुपये दर आहे. यामध्ये केवळ २०० रुपयांची तफावत आहे. याशिवाय तूर खरेदी चाळणी करून केली जाते. यामुळे इतर शेतमाल शेतकऱ्यांना खुल्या बाजारात विकावा लागतो. त्या तुलनेत २०० रुपये कमी असले, तरी संपूर्ण शेतमाल खुल्या बाजारात खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांनी नाफेडच्या हमी केंद्राकडे पाठ फिरविली आहे.

**शेतकऱ्यांच्या नोंदी**

राज्यभरात विविध केंद्रांवर २५ हजार शेतकऱ्यांनी तूर विक्रीसाठी नोंदणी केली आहे. शेतकऱ्यांना मेसेज पाठविण्यात आले आहेत. मात्र, अजूनपर्यंत शेतकऱ्यांनी केंद्रांवर तूर आणलेली नाही.

# पथ्रोट - भुलेश्वरी - गोंडवाघोली रस्त्याची झाली दूरावस्था : खड्ड्यात रूपांतर झाले रस्ते

विदर्भ प्रजासत्ताक दि.७पथ्रोट

भुलेश्वरी , गोंडवाघोली रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. पथ्रोट वरून भुलेश्वरी गोंडवाघोली मार्गाचा रूपांतर खड्ड्यामध्ये झाला असून नागरिकांना नाहक त्रास भोगाव लागत आहे .हा रस्ता शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून शेतमालासाठी हा रस्ता प्रमुख आहे , काही वर्षापासून या रस्त्याची अत्यंत दूरवस्था झाली असून अचलपूर लोक निर्माण विभागाचा दुर्लक्ष असल्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक ही जीवघेणी झाली आहे , असंख्य अपघात या रस्त्यावर होत आहे , भुलेश्वरी येथील महादेवांचा मंदिर ऐतिहासिक असून येथील पिंड पांडवांनी उभारली आहे असा या महादेवांच्या मंदिराचा इतिहास आहे , दरवर्षी



महाशिवरात्रीनिमित्त भुलेश्वरी येथील मंदिरावर यात्रेचे आयोजन होते असंख्य भाविक भक्त या मंदिरावर दर्शनाकरिता येतात , परंतु अशा ऐतिहासिक मंदिराला जोडणारे प्रमुख रस्त्यांची अत्यंत दूरवस्था झाल्यामुळे भाविक भक्तांना सुद्धा मोठा त्रास होत आहे वाल्मीकपूर ते कासमपूर हा रस्त्याचा मागच्याच वर्षात निर्माण झाला असून या रस्त्याची सुद्धा अत्यंत दूरवस्था व्यवस्था झाली आहे , कासमपूर ते कुणबीवाघोली या मार्गाचा निर्माण कार्य अर्थसंकल्प निधी अंतर्गत एक कोटी २० लक्ष रुपये खर्च करून मागील वर्षात करण्यात आला होतं परंतु या मार्गावर सुद्धा अनेक ठिकाणी खड्डे निर्माण झाले आहे संतोष पोहोकार नामक कंत्राटदाराने या रस्त्याचा निर्माण कार्य मागील वर्षात केले होते परंतु या रस्त्याचा खड्ड्यामध्ये रूपांतर झाल्यामुळे , प्रवासी नागरिकांना मोठा त्रास होत आहे लोक निर्माण विभागाने याकडे गंभीरतेने लक्ष देऊन त्वरित पथ्रोट , भुलेश्वरी , गोंडवाघोली , वागडोह गावाला जोडणाऱ्या रस्त्याचा निर्माण कार्याची सुरुवात करावी अशी मागणी भाविक भक्तांसहित नागरिकांनी केली आहे.